# मशिदींवरचे भोंगे ३ मेपर्यंत उतरवा –राज ठाकरे



**ठाणे :** देशातील आणि राज्यातील मशिदींवरील सर्व भोंगे ३ मेपर्यंत उतरवा. आम्ही आमची भूमिका मागे घेणार नाही, असे सांगत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकारला अल्टिमेटम दिला आहे. जर मशिदींवरचे भोंगे उतरवले नाही, तर हनुमान चालीसा लावणारच, असेही राज यांनी मंगळवारी (दि. १२) ठाणे येथे झालेल्या सभेत स्पष्ट केले. ३ तारखेला ईद आहे. माझी राज्य सरकारला, गृहखात्याला विनंती आहे की, आम्हाला कुठलीही तेढ, दंगल निर्माण करायची नाहीये. त्याची इच्छादेखील नाही. त्यामुळे १२ एप्रिल ते ३ मे महाराष्ट्रातील सगळ्या मशिदींमधील मौलवींशी राज्य सरकारने चर्चा करावी आणि त्यांना सगळे भोंगे खाली उतरवण्यास सांगावे, असे राज ठाकरे म्हणाले.


बुधवार, १३ एप्रिल २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २६५
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


विद्यार्थ्यांकडून बाबासाहेबांच्या कार्याला उजाळा/३

नेरळजवळ रेल्वेमार्गावर विद्यार्थिनीचा मृतदेह/७

रायगडच्या अजय पाटीलने रचला विश्वविक्रम/८


# महाराष्ट्र पुन्हा अंधाराच्या खाईत!

## ■ भारनियमनावरून विरोधी पक्षनेते फडणवीसांची मविआ सरकारवर टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी मंगळवारी (दि. १२) कोळसा संकटाच्या पार्श्वभूमीवर भारनियमनाचा निर्णय घेण्यात येत असल्याची घोषणा केली. यानंतर विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी भारनियमानावरून राज्यातील महाविकास आघाडी सरकारवर हल्ला चढवला. फडणवीस यांनी ट्वीट करीत मविआवर राज्याला पुन्हा अंधाराच्या खाईत लोटल्याची टीका केली आहे.

ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी, भारनियमन होऊ नये याची काळजी घेत आहोत, पण अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वीज गळती, वीज चोरी होत आहे. तेथे भारनियमन करून आम्ही सावरण्याचा प्रयत्न करीत आहोत, कारण आम्हाला दरदिवशी बाजारातून १५०० ते २५०० मेगावॅट वीज विकत घ्यावी लागते. त्यासाठी साडेसहा ते १२ रुपयांपर्यंतचा दर आहे. पैशाची टंचाई असताना इतकी महागडी वीज विकत घेणे सोपे नाही, असे म्हटले. याचा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी समाचार घेतला आहे.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सावध! ऐका पुढल्या हाका. टँकरमुक्तीतून पुन्हा टँकरयुक्त, भारनियमनमुक्तीतून पुन्हा भारनियमनाकडे, राज्यात केवळ आणि केवळ भ्रष्टाचार, 'नो गव्हर्नन्स'मुळे जनता हैराण असून आता परिणाम दिसू लागले आहेत. अधोगतीकडे वाटचाल सुरू आहे.

आजपासून महाराष्ट्रात भारनियमन पुन्हा सुरू झाले. यंदा उन्हाच्या झळा तीव्र असताना जनतेला घामाघूम करण्याचे आणि राज्याला पुन्हा अंधाराच्या खाईत लोटण्याचे पाप महाविकास आघाडीने अखेर केलेच. वाफाळ शब्दांपेक्षा प्रशासकीय कौशल्याचा थोडा कस लावून जनतेला तत्काळ दिलासा द्यावा, अशी आमची मागणी आहे, असेही विरोधी पक्षनेते फडणवीस यांनी म्हटले आहे.



# नवीन पनवेलमध्ये पुलाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती तथा विद्यमान नगरसेवक संतोष शेट्टी प्रयत्नांमुळे नवीन पनवेल येथील डीएव्ही शाळेजवळ पूल उभारण्यात आला आहे. या पुलाचे उद्घाटन महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. ११) झाले. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विकासासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहा, असे प्रतिपादन केले.

### विद्यार्थ्यांसह नागरिकांना सुविधा

भाजपच्या सत्ताधारी नगरसेवकांमार्फत नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार नवीन पनवेल येथील डीएव्ही शाळेजवळ असलेल्या नाल्यामुळे या ठिकाणाहून जाणाऱ्या नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना त्याचा त्रास होत होता. पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती तथा विद्यमान नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या प्रयत्नांमुळे या नाल्यावर पूल उभारण्यात आला आहे. या पुलाचे उद्घाटन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या वेळी नगरसेवक राजू सोनी, समीर ठाकूर, नगरसेविका राजश्री वावेकर, डीएव्ही स्कूलच्या मुख्याध्यापिका चैतन्या रेड्डी, शिवाजी भगत, जितेंद्र तिवारी, अक्षय सिंग, शोभा सातपुते, कुलबीर चंडोक, आशा शेट्टी, विठाबाई सावंत, आर.पी. पाटील, देवेंद्र परब, श्याम शहा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

### जेएनपीएच्या बार्जमध्ये भीषण स्फोट

## एक कामगार ठार, दोन जण गंभीर, दोघे बेपत्ता

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीएच्या शॉलो वॉटर बर्थजवळ असलेल्या ड्रेझिंग बार्जमध्ये सोमवारी (दि. ११) पेंटिंगचे काम सुरू असताना ज्वलनशील थीनरला आग लागून भीषण स्फोट झाला. या स्फोटात एक कामगार जागीच ठार झाला आहे, तर दोन कामगार जबर जखमी झाले असून दोघे बेपत्ता आहेत.

जेएनपीएच्या शॉलो वॉटर बर्थजवळ मागील पाच-सहा महिन्यांपासून रो-रो सर्व्हीस जेट्टीचे काम सुरू आहे. या अंतर्गत समुद्रात खोली वाढविण्यासाठी ड्रेझिंगचे काम सुरू असून या ड्रेझिंग बार्जमध्ये सोमवारी पेंटिंग्जचे काम करण्यासाठी सहा कामगार उतरले होते. या ठिकाणी रंगात मिसळण्यासाठी ठेवण्यात आलेल्या ज्वलनशील थीनरला सायंकाळी सहा-साडेसहाच्या सुमारास आग लागली व भीषण स्फोट झाला. **(पान २ वर..)**



**पनवेल : भाजप नगरसेवक अजय बहिरा यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, मोफत ई-श्रम महानोंदणी अभियान आणि ई-श्रम कार्ड वाटप तक्का गाव येथे आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.** **(वृत्त पान ३ वर..)**

### नगरसेवक मनोहर म्हात्रे यांना पितृशोक

## माजी उपनगराध्यक्ष जानूशेठ म्हात्रे यांचे निधन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती व विद्यमान नगरसेवक मनोहर म्हात्रे यांचे वडील माजी उपनगराध्यक्ष जानूशेठ कानाशेठ म्हात्रे यांचे मंगळवारी (दि. १२) सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते.


धाकटा खांदा गणपती देवस्थानचे अध्यक्ष असलेल्या जानूशेठ म्हात्रे यांच्या निधनाचे वृत्त समजताच भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक-नगरसेविका यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले.

कै. जानूशेठ म्हात्रे यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि. २१) श्री क्षेत्र नाशिक, तर उत्तरकार्य रविवारी (दि. २४) राहत्या घरी होणार आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे भाऊ आणि मोठा परिवार आहे.

तेव्हा..




आता..




### विवेक पाटलांच्या जामिनाबाबत आज निकाल

# सर्व दोषींवर ठोस कारवाई कधी होणार?

## ठेवीदारांना हक्काचे पैसे परत कसे मिळणार?

**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामिनाचा निर्णय न्यायालय बुधवारी (दि. १३) होणाऱ्या सुनावणीदरम्यान देणार आहे. या वेळी विवेक पाटील यांची जामिनावर का होईना पण सुटका होईल, अशी आशा शेकाप कार्यकर्त्यांना वाटत आहे, मात्र कर्नाळा बँक घोटाळ्याचे सूत्रधार विवेक पाटलांसह सर्व दोषींविरुद्ध काय ठोस कारवाई होणार तसेच ठेवीदार, खातेदारांना त्यांचे हक्काचे पैसे परत कधी मिळणार हे प्रश्न अद्यापही अनुत्तरीतच आहेत.

गेले अनेक महिने सुनावणी सुरू असलेल्या या खटल्याची पार्श्वभूमी अशी की, कर्नाळा बँकेचे तत्कालीन अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांना १५ जून २०२१ रोजी 'ईडी'ने कर्नाळा बँकेतील ५२९ कोटींहून अधिक रुपयांच्या घोटाळाप्रकरणी अटक केली, मात्र महाराष्ट्र सरकारच्या सहकार आणि पोलीस या दोन्ही खात्यांनी या प्रकरणी कोणतीही कडक कारवाई केली नाही. 'ईडी'ची कोठडी संपल्यावर विवेक पाटील यांना आर्थर रोड कारागृहात ठेवण्यात आले होते. **(पान २ वर..)**







# भावपूर्ण श्रद्धांजली



पनवेल नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष

**जानूशेठ कानाशेठ म्हात्रे**

यांचे मंगळवार, दि. १२ एप्रिल २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**दशक्रिया विधी**

गुरुवार, दि. २१ एप्रिल २०२२ रोजी
श्री श्रेत्र नाशिक येथे होणार आहे.

**तेरावा विधी**

रविवार, दि. २४ एप्रिल २०२२ रोजी
राहत्या घरी होणार आहे.

**शोकाकूल**

| | |
|---|---|
| बाळकृष्ण जानू म्हात्रे | दीपक गुरुनाथ म्हात्रे |
| मनोहर जानू म्हात्रे | राजू गुरुनाथ म्हात्रे |
| गुरुनाथ काना म्हात्रे | विनायक अंबाजी म्हात्रे |
| अंबाजी काना म्हात्रे | हरेश अंबाजी म्हात्रे |
| रामभाऊ माया म्हात्रे | हर्षल बाळकृष्ण म्हात्रे |
| किशोर बबन म्हात्रे | मंदार बाळकृष्ण म्हात्रे |
| चंद्रकांत बबन म्हात्रे | निरांत परशुराम म्हात्रे |
| महेंद्र बबन म्हात्रे | सिद्धार्थ मनोहर म्हात्रे |

गिरीश गुरुनाथ म्हात्रे

**समस्त म्हात्रे परिवार, धाकटा खांदा**
(ता. पनवेल)

टीप : मामाशिवाय कुणीही दुखवटा आणू नये.

# कोणत्याही चौकशीला मी तयार!

## ■ भाजप प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांचे आव्हान



**मुंबई : प्रतिनिधी**

बलात्कार पीडितेने आपल्यावर केलेल्या आरोपांची राज्य सरकारने जरूर चौकशी करावी, कोणत्याही चौकशीला आपण तयार आहोत असे आव्हान भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी मंगळवारी (दि. १२) पत्रकार परिषदेत दिले.

भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी या वेळी या प्रकरणाचा संपूर्ण घटनाक्रम उलगडून सांगितला. त्यांनी सांगितले, १६ फेब्रुवारी रोजी पीडित तरुणीने आपल्याला दूरध्वनी केला. त्या वेळी आपण राज्याबाहेर होते. राज्यात परतल्यानंतर दोन ते तीन दिवसांनी पुण्यात पीडित तरुणीची आपली भेट झाली. या तरुणीने आपल्याला तिच्यावर २०१७ पासून झालेल्या अत्याचारांबाबत सांगितले. त्या पीडितेने तिच्यावर वेगवेगळ्या रुग्णालयात झालेल्या उपचारांबाबतची माहितीही कागदपत्रांसह आपल्याला दिली. हे पुरावे पाहून आपण त्या तरुणीसाठी आवाज उठविण्याचे ठरवले. पुण्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह राज्याच्या गृहमंत्र्यांनाही या तरुणीवरील अत्याचारांची माहिती कळवली. ती तरुणी एकटी लढत असून आपण तिला साथ दिली पाहिजे या भावनेने आपण तिच्यासाठी लढण्याचे ठरवले. मुंबईत प्रसार माध्यमांपुढे त्या पीडितेला आणून तिची कहाणी ऐकवायला लावली. हे करताना एका महिलेला न्याय देण्याची आपली भूमिका होती. ही आपली चूक असेल तर ती मला कबूल आहे.

पीडित तरुणीने कोणकोणते संदेश मोबाईलच्या माध्यमातून आपल्याला पाठवले याची माहितीही वाघ यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्या म्हणाल्या की, आता पीडितेने कोणत्या हेतूने आपल्यावर आरोप केले आहेत हे मला ठाऊक नाही. ज्यावेळी ही तरुणी न्याय मागत होती त्या वेळी तिच्या मदतीस कोणीही आले नाही. आता तिने माझ्यावर आरोप केल्यानंतर सर्वजण माझ्या विरोधात पीडितेच्या बाजूने बोलत आहेत. या आरोपांबद्दल आपण पीडितेला दोष देणार नाही. तरुणीच्या आरोपाची राज्य सरकारने हव्या त्या यंत्रणेच्या माध्यमातून चौकशी करावी. या चौकशीतून सत्य बाहेर यावे आणि पीडितेला न्याय मिळावा अशीच आपली भावना असल्याचे चित्रा वाघ यांनी नमूद केले.

# ही तर ग्राहकांना लुबाडण्यासाठी कृत्रिम वीजटंचाई; भाजपचा आरोप

## आघाडी सरकारला जाब विचारण्याचे वीज नियामक आयोगाला आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

सामान्य ग्राहकाच्या खिशात हात घालून खासगी क्षेत्राला लाभ मिळवून देण्यासाठी कोळशाची कृत्रिम टंचाई निर्माण करून वीजसमस्या भासविण्याचा कट आघाडी सरकारने आखला आहे, असा आरोप भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी मंगळवारी (दि. १२) केला. सरकारच्या या स्वार्थीपणामुळे वीजग्राहकांवर भारनियमनाचे संकट ओढवले आहे. शिस्तबद्ध पद्धतीने टंचाई निर्माण करून दरवाढीच्या माध्यमातून पैसे गोळा करण्याचाच हा डाव आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

कोळसाटंचाईमुळे औष्णिक विद्युत प्रकल्पातील वीजनिर्मिती कमी झाल्याचे कारण पुढे केले जात असले तरी त्यास आघाडी सरकार आणि महानिर्मिती कंपनीचा धोरणशून्य कारभारच जबाबदार असताना त्याचा फटका दरवाढीच्या रूपाने सामान्य ग्राहकांवर लादणारे सरकार माणुसकीशून्य आहे, असेही उपाध्ये यांनी म्हटले आहे. अगोदरच भारनियमनामुळे व अनियमित वीजपुरवठ्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी त्रस्त आहे. वेळेवर व हमीपूर्वक वीजपुरवठा होत नसल्याने शेतातील पिके पाण्याअभावी करपण्याच्या चिंतेने शेतकऱ्यास ग्रासले आहे. रात्री अपरात्री केव्हाही अनियमितपणे होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी कुटुंबांची झोप उडाली आहे. आता सरसकट भारनियमन लादून सरकारने सामान्य वीजग्राहकाची झोपदेखील उडविली आहे, असा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रातील वीजनिर्मिती प्रकल्पांच्या आधुनिकीकरणाकडे राज्य सरकार जाणीवपूर्व डोळेझाक करीत आहे, असे सांगून उपाध्ये यांनी म्हटले आहे की, मार्चपासून जूनअखेरपर्यंत विजेची मागणी वाढते हे स्पष्ट असतानाही औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांकरिता कोळसाचा पुरेसा साठा करण्याकडे सरकारने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. कोळशाची कृत्रिम टंचाई भासवून खासगी क्षेत्राकडून वाढीव भावाने कोळसा खरेदी करीत खासगी क्षेत्राचे हितसंबंध जपण्याकरिता गरीब ग्राहकांच्या खिशात हात घालणाऱ्या सरकारने समस्याग्रस्त जनतेवर वीजटंचाईचे नवे संकट लादले आहे. ग्राहकाच्या हितास प्राधान्य देण्यासाठी स्थापन झालेल्या राज्य वीज नियामक आयोगाने या समस्येत स्वतःहून लक्ष घालून टंचाईबाबत राज्य सरकारला व वीज मंडळास जाब विचारला पाहिजे.

पान १ वरून

# विवेक पाटलांच्या जामिनाबाबत आज निकाल

विवेक पाटील यांच्या वकिलांनी वैद्यकीय कारणाखाली त्यांना आर्थर रोड जेलऐवजी तळोजा कारागृहात हलवण्याची मागणी केली. ती मंजूर करण्यात आली. ईडीने त्यांच्यावर १२ ऑगस्ट २०२१ रोजी आरोपपत्र दाखल केले. त्यावरील सुनावणीत त्यांनी त्यांच्या जामिनासाठी न्यायालकडे अर्ज केला. त्याचा निकाल बुधवारी (दि. १३) लागणार आहे. या संपूर्ण कालावधीत सत्र न्यायालयात वेगवेगळ्या तीन अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी सुनावणी केली.

या खटल्याच्या आतापर्यंत ३६ वेळा तारखा पडून कामकाज झाले. यात 'ईडी'तर्फे ॲड. सुनील गोन्साल्वीस, ॲड. वेनेगावकर यांनी काम पहिले, तर विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. सुबीर सरकार, ॲड. पवन चेड्डा, ॲड. ऋषिकेश मुंदरगी, ॲड. अशोक मुंदरगी, ॲड. राहुल ठाकूर, ॲड. चेतन ठाकूर यांनी बाजू सांभाळण्याचा प्रयत्न केला.

### ■ मोदी सरकारमुळे ठेवीदारांना दिलासा

कर्नाळा बँकेच्या ठेवीदारांना 'डिपॉझिट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरन्टी'कडून पाच लाखांपर्यंतच्या ठेवींची रक्कम देण्यात येत आहेत. ठेव विमा आणि क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन हा भारतीय रिझर्व्ह बँकेचा एक विशेष विभाग आहे, जो भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अखत्यारीत आहे. १५ जुलै १९७८ रोजी ठेव विमा आणि क्रेडिट हमी कॉर्पोरेशन कायदा १९६१ अंतर्गत ठेवींचा विमा आणि क्रेडिट सुविधांची हमी देण्याच्या उद्देशाने याची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील विद्यमान केंद्र सरकारने त्यामध्ये बदल करून विम्यातून मिळणाऱ्या रकमेत वाढ करून एक लाखाऐवजी पाच लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली तसेच बँक अवसायनात निघल्यास ९० दिवसांत हे पैसे खातेदारांना परत देण्याची तरतूद केल्याने हे पैसे मिळत आहेत.

आतापर्यंत सात हजार ९०० ठेवीदारांना १५१ कोटींचे वाटप झाले आहे. यातील पहिला टप्पा महिनाभरात पूर्ण होईल. ज्यांनी अर्ज केले आहेत, पण ते काही कारणामुळे पैसे घेण्यासाठी आले नाहीत त्यांच्यासाठी (नावाच्या आद्याक्षरांनुसार म्हणजेच अल्फा बेटिकल ए ते एन) १८ एप्रिल २०२२ हा दिवस ठेवला आहे. त्या दिवशी त्यांना येण्याचे आवाहन प्रशासक ए. आर. हांडे यांनी केले आहे.

### ■ शेकापच्या कट्टर कार्यकर्त्यांचा आपल्याच नेत्यांवर रोष

कर्नाळा बँकेच्या खातेदार आणि कर्जदारांना कोट्यवधी रुपयांना डुबवून सध्या जामिनाच्या प्रतीक्षेत असलेले कर्नाळा बँकेचे तत्कालीन अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांना जामीन मिळेल या आशेवर शेकाप कार्यकर्ते आजही आहेत. याबाबत बुधवारी न्यायालयात होणाऱ्या सुनावणीत स्पष्ट होईल, पण साहेबांना (विवेक पाटील) देव मानणाऱ्या कट्टर शेकाप कार्यकर्त्यांना आजही वाटत आहे की, साहेब येतील आणि पुन्हा पहिल्यासारखे दिवस येतील. येणाऱ्या निवडणुकीत साहेब पुन्हा पैसे खर्च करतील, असा विश्वासही त्यांना वाटत आहे, मात्र शेकापच्या सध्याच्या काही नेत्यांवर या कट्टर कार्यकर्त्यांचा राग आहे. यातील काही नेत्यांनी वेळोवेळी विवेक पाटीलसाहेबांकडून निवडणुकीसाठी पैसे घेतले आणि ते कधीही परत तर केले नाहीत आणि त्याचा खासगीतही कधीही उच्चार केला नाही, असे कट्टर कार्यकर्त्यांनी आपले नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

### ■ 'मविआ'च्या कुबड्यांचा शेकापला आधार

सध्या महागाईसारखे विविध मुद्दे काढून बैठका घेण्याचा सपाटा शेकापने लावला आहे. मुळात शेकापची राजकीय ताकद रायगड जिल्ह्यात कमी झालेली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नावाखाली शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या लोकल नेत्यांना पाचारण करून आंदोलनाच्या घोषणा तूर्त केल्या जात आहेत. विवेक पाटील जेलबाहेर आल्यानंतरच शेकापच्या उद्योगांना 'रंग' येईल, अशीही समाजात चर्चा आहे, मात्र तब्येतीमुळे विवेक पाटील राजकारणात सक्रिय राहणार नाही, असेही शेकापच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले.

### ■ खाऊन झाले, आता ढेकरही देत नाहीत..!

निवडणुकीच्या काळात तर ठराविक नेत्यांनी आपली पोटं पैशांनी भरली. भरपूर खाल्लं, पण आता ढेकरही देत नाहीत. सगळा त्रास जो काही आहे तो आमच्या साहेबांनाच (विवेक पाटील), अशीही संतप्त प्रतिक्रिया शेकापच्याच कट्टर कार्यकर्त्याने व्यक्त केली.

### ■ सहकार विभागाकडून दोषी संचालकांवर वसूली रक्कम निश्चित

कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ५२९ कोटी ३६ लाख ५५ हजार २६ रुपयांच्या कर्ज घोटाळाप्रकरणी माजी आमदार विवेक पाटील आणि त्यांचा मुलगा अभिजित विवेक पाटील यांच्यासह १९ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जबाबदार धरण्यात आले असून त्यांच्यावर आणि मृत संचालकाच्या वारसांवर आरोपपत्रही बजावण्यात आले आहे. या सर्वांवर कर्जाच्या नुकसानीची वसुली करण्याच्या रकमादेखील निश्चित करण्यात आल्या असून, त्या प्रत्येकी १६ ते २९ कोटी रुपये आहेत. त्यामुळे विवेक पाटील यांनी भ्रष्टाचाराने लाटलेला पैसा आपण कसा भरायचा, असा प्रश्न आता उर्वरित संचालकांपुढे पडला आहे.

बँकेचे तत्कालीन संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, पदाधिकारी, व्यवस्थापक यांनी केलेले बोगस कर्जवाटप, अपकार्य, विश्वासघात, आर्थिक गैरव्यवहार यामुळे कर्नाळा बँक अडचणीत आली. जिल्हा विशेष लेखापरीक्षकांनी १३ डिसेंबर २०१९ रोजी सादर केलेल्या विशेष लेखापरीक्षण अहवालामुळे ही बाब उघडकीस आली.

## कर्नाळा बँक संचालक, सीईओ यांच्यावर वसुलीसाठी सहकार विभागाने निश्चित केलेली रक्कम; मात्र राज्य सरकारकडून अद्याप कारवाई नाही

| अनु.क्र. | व्यक्तीचे/वारसाचे नाव | नुकसानीच्या जबाबदारीची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | श्री. विवेकानंद शंकर पाटील, अध्यक्ष | २९,२८,३८,३३१.२८ |
| २. | श्री. भालचंद्र रामभाऊ तांबोळी, संचालक | २९,२८,३८,३३१.२८ |
| ३. | (मयत) श्री. पुंडलिक आत्माराम म्हात्रे, उपाध्यक्ष, यांचे वारस<br>१. श्री. विलास पुंडलिक म्हात्रे<br>२. श्री. अरविंद पुंडलिक म्हात्रे<br>३. श्रीम. विजया पुंडलिक म्हात्रे<br>४. श्रीम. निता पुंडलिक म्हात्रे | २०,८७,१२,५९८.७४ |
| ४. | श्री. सुभाष मधुकर देशपांडे, उपाध्यक्ष | २९,२८,३८,३३१.२८ |
| ५. | श्री. विष्णू चिंतू म्हात्रे, संचालक | २६,०८,१४,०८८.२५ |
| ६. | डॉ. आरिफ युसूफ दाखवे, संचालक | २९,२८,३८,३३१.२८ |
| ७. | श्री. सुनील मोरेश्वर मोरे, संचालक | २०,८७,१२,५९८.७४ |
| ८. | (मयत) श्री. बाळानाथ सीताराम म्हात्रे, संचालक, यांचे वारस<br>१. श्री. वर्धमान बाळानाथ म्हात्रे<br>२. श्रीम. गिताबाई बाळानाथ म्हात्रे<br>३. श्री. तुषार बाळानाथ म्हात्रे<br>४. श्री. महेश बाळानाथ म्हात्रे<br>५. श्री. राहुल बाळानाथ म्हात्रे | २१,१९,८७,९४६.८७ |
| ९. | श्री. रामचंद्र धोंडू पाटील, संचालक | २९,२८,३८,३३१.२८ |
| १० | श्री. अभिजित विवेकानंद पाटील, संचालक | २६,०८,१४,०८८.२५ |
| ११ | श्री. धर्मराज उंदू नाईक, संचालक | २९,२८,३८,३३१.२८ |
| १२. | श्री. मच्छिंद्र कृष्णा नाईक, संचालक | २६,०८,१४,०८८.२५ |
| १३. | श्री. रवींद्र ग्येनबा कांबळे, संचालक | २०,८७,१२,५९८.७४ |
| १४. | श्री. अजय तुकाराम बहिरा, संचालक | १६,१७,१३,१२२.७७ |
| १५. | श्री. रवींद्र श्रावण चोरघे, संचालक | २९,१९,४२,९७१.४५ |
| १६. | श्री. सदाशिव महादू वाघ, संचालक | २९,१९,४२,९७१.४५ |
| १७. | सौ. पूनम प्रकाश वाजेकर, म. संचालिका | २९,२८,३८,३३१.२८ |
| १८. | सौ. शालिनी शंकर ठाणगे, म. संचालिका | २९,२८,३८,३३१.२८ |
| १९ | सौ. ज्योती नंदू कापसे, म. संचालक | २९,१९,४२,९७१.४५ |
| २० | श्री. हेमंत मुरलीधर सुताने, मुख्य कार्यकारी अधिकारी | २९,२८,३८,३३१.२८ |
| | | एकूण : ५२९,३६,५५,०२६.०० |

# जेएनपीएच्या बार्जमध्ये भीषण स्फोट

या स्फोटात अब्दुल सलाम (२१) हा कामगार जागीच ठार झाला, तर हिरालाल प्रजापती (२५) हा कामगार ९० टक्के भाजल्याने त्याला जेएनपीटी ट्रॉमा सेंटरमधून ऐरोली येथील बर्न इस्पितळात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. आणखी एक गंभीररित्या जखमी झालेला कामगार अनुज राजवीर सिंह (२३) याच्यावर जेएनपीटी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती डॉ. बी. एस. देसाई यांनी दिली, तर अन्य दोन कामगार मनीष (२२) व बालक (२२) बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

या घटनेबाबत पोलीस पथक अधिक माहिती घेत असल्याचे न्हावा-शेवा बंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर भटे यांनी सांगितले.

# मुंबै बँकप्रकरणी प्रवीण दरेकर यांना दिलासा

## हायकोर्टाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. मुंबै बँकेच्या निवडणुकीत कथित बोगस मजूरप्रकरणी दरेकरांचा अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा अनेक वर्षे तपास सुरू आहे. त्यामुळे अटकेची आवश्यकता नसल्याचे उच्च न्यायालयाने सांगितले. याशिवाय जरी तपासादरम्यान पोलिसांनी प्रवीण दरेकरांना अटक केली तरी त्यांना तत्काळ ५० हजारांच्या बंधपत्रावर सुटका करण्याचे आदेशही न्यायालयने दिले आहेत. केवळ राजकीय हेतूने प्रेरित असा हा एफआयआर नोंदवला गेल्याचे यावरून दिसून येते, असे दरेकर यांच्या वकिलांनी म्हटले आहे.


मा. गोडसे साहेब कोर्ट
मो. ८१०८३५५०००
ॲड. आशा अरुणकुमार भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ. अर्ज क्र. ४९३/२०२२
निशाणी क्रमांक ८/ड
ने.ता. २१/०६/२०२२

१. श्रीमती. प्रभाबाई युवराज नरवाडे
वय ५६ वर्षे, धंदा-घरकाम

२. श्री. प्रवीण युवराज नरवाडे
वय ३३ वर्षे, धंदा-व्यवसाय

अर्जदार

सदरहू अर्जदार क्र. १ यांचे पती व क्रमांक २ यांचे वडील कै. युवराज रामदास नरवाडे हे दिनांक ३१/०१/२०२० रोजी कामोठे गावी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे मयत झाले आहेत. व कै. तुळसाबाई युवराज नरवाडे ह्या दिनांक २३/०८/२०१५ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांच्या पश्चात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणून नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. युवराज रामदास नरवाडे यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहू अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

कै. तुळसाबाई रामदास नरवाडे (मयत मूळ पुरुषाची मयत आई)
↓
कै. युवराज रामदास नरवाडे (मयत मूळ पुरुष)
↓
श्रीमती. प्रभाबाई युवराज नरवाडे (मयत मूळ पुरुषाची पत्नी)
↓
श्री. प्रवीण युवराज नरवाडे (मयत मूळ पुरुषाचा मुलगा)

सदरहू कै. युवराज रामदास नरवाडे यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनिकेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मौजे कामोठे, पनवेल येथील सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंटचे नाव व क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| गंगोत्री अे/३०२ | ६८ | १८ | ४,६६,०००/- |

सदरहू सदनिका कै. युवराज रामदास नरवाडे यांच्या नावे होती व ती व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. युवराज रामदास नरवाडे यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर भूखंड हस्तांतरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रिक बाबींचा अडथळा येऊ नये ह्या कारणास्तव वरील मयत व्यक्तींचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करून मागत आहेत.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज दिनांक १२/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपीक
व. स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधीक्षक
व. स्तर, पनवेल



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

**Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-5/22-23 (RFX No. 7000023007)**

**Period for submission of E-Bid: 12.04.2022 to 19.04.2022 up to 23:59 hrs**

**Name of Work : AMC of various maintenance activities to be carried out under planned and emergency outages at 400kV RS, Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs) | Tender Fee (Rs) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| Limited to Rs.25,00,000/- (Including GST) | Rs. 25,000/- | Rs.500/- + GST | **19.04.2022** up to 23:59 hrs | **20.04.2022** at 10:00 hrs (If possible) | **20.04.2022** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer (Charge), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



### पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२२/प्र.क्र.२५/८२अ/२२ दिनांक :- ११/०४/२०२२

**पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा**
**सभा सूचना क्र. ४६, दिनांक १९/०४/२०२२**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक १९/०४/२०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता पनवेल महापालिकेचे (आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल) या ठिकाणी खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस उपस्थित राहावे.

**सभा सूचना क्र. ४६ दिनांक १९/०४/२०२२ ची**

**विषय पत्रिका**

**१) मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे.**
पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक १८/०२/२०२२ तसेच सर्वसाधारण सभा ०४/०३/२०२२ विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २३/०३/२०२२ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**२) प्रश्नोत्तरे**

**३) मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज**
१. पूर्वाश्रमीच्या पनवेल नगर परिषदेमार्फत ६ वाणिज्य संकुलातील ३० वर्षाच्या कालावधीकरिता लिज भाडेतत्त्वावर देणेत आलेले गाळे लिज करारनामा करणेकामी तसेच हस्तांतरीत करणेकामी मान्यता मिळणेबाबत.
२. पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी नवीन अग्निशमन वाहन खरेदी करणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ''अ'', प्रभाग क्र. ०३ मधील तळोजा सेक्टर १५, भूखंड क्र. ८ व ९ येथे मुस्लिम समाजासाठी दफनभूमी तयार करणे.
(मा. महापौर महोदया यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

**महापालिका भवन, पनवेल**
**दिनांक :- ११/०४/२०२२**

सही/-
**(तिलकराज खापर्डे)**
नगर सचिव
पनवेल महानगरपालिका, पनवेल

**सोबत** - सर्वसाधारण सभा दिनांक १८/०२/२०२२ तसेच सर्वसाधारण सभा ०४/०३/२०२२ विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २३/०३/२०२२ इतिवृत्त व विषयांचे गोषवारे.

# विद्यार्थ्यांनी दिला बाबासाहेबांच्या कार्याला उजाळा

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मनपाच्या वतीने निबंध व वक्तृत्व स्पर्धा उत्साहात




**पनवेल : वार्ताहर**

भारत देश स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केलेल्या स्वातंत्र्यवीरांचा गौरव महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. याअंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती महापालिका मोठ्या उत्साहात लोकसहभागातून साजरी होणार आहे. याचाच एक भाग म्हणून मंगळवारी (दि. १२) निबंध व वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन पीर करमअली मनपा शाळा क्र.१० या ठिकाणी करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला उजाळा दिला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांच्या हस्ते करण्यात आले.

महापौर डॉ. कविता चौतमोल आणि नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख करून देत मार्गदर्शन केले. ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांचे दोन गट आणि खुला एक गट होता. निबंध स्पर्धेत आणि वक्तृत्त्व स्पर्धेत पनवेल महानगरपालिकेच्या ११ शाळांसह याकूब बेग शाळा, सीकेटी शाळा, न्यू इंग्लिश स्कूल मार्केट यार्ड येथील शाळांमधील ३० विद्यार्थी सहभागी झाले आहे. त्याचबरोबर खुल्या गटात शहरातील विविध भागातून १६ जणांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेतील विजेत्यांना डॉ. आंबेडकर जयंती दिवशी रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे, तसेच स्पर्धेत सहभाग घेणाऱ्यांनादेखील प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या वेळी शिक्षण विभागातील दशरथ म्हात्रे, आश्पाक काझी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.




पनवेल : खांदा कॉलनी येथील शंकर मंदिराजवळील उद्यानामध्ये ओपन जीम सुरू झाली आहे. या जीमचे काम पनवेल महापालिकेचे नगरसेवक एकनाथ गायकवाड यांच्या निधीमधून करण्यात आले आहे. या जीमचे उद्घाटन मॉर्निंग योगा ग्रुपचे संजय वैद्य यांच्या हस्ते मंगळवारी झाले. या वेळी नगरसेवक एकनाथ गायकवाड, सुनील श्रीखंडे, मॉर्निंग योगा ग्रुप, आनंदी ग्रुप आणि भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नगरसेवक अजय बहिरा यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

## आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभली प्रमुख उपस्थिती




**पनवेल : प्रतिनिधी**

महानगरपालिकेतील भाजपचे नगरसेवक अजय बहिरा यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर तसेच मोफत ई-श्रम महानोंदणी अभियान आणि ई-श्रम कार्ड वाटप तक्का गाव येथे आयोजित करण्यात आले होते.



या उपक्रमाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, तेजस कांडपीळे, नगरसेविका चारुशीला घरत, वृषाली वाघमारे, रुचिता लोंढे, भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, संदीप बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, अमन अख्तर, किरण बहिरा, जितू खुटकर, प्रशांत बहिरा, तुषार बहिरा, श्रेयस बहिरा, राम सागर, संदेश घरत, प्रमोद बहिरा, भारत बहिरा, किरण बहिरा यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांनी नगरसेवक अजय बहिरा यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले. या शिबिरात ९० रक्तदात्यांनी रक्तदान केले, तसेच ७० लाभार्थ्यांना ई-श्रम कार्ड वाटप करण्यात आले, तर १९० जणांची ई-श्रम कार्डसाठी नोंदणी झाली.

# १३१ नवउद्योजक घडविण्याचा संकल्प

## राहुल शिक्षक प्रसारक मंडळाचा डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हैदराबाद मुक्तीसंग्राम लढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी स्थापन केलेल्या राहुल शिक्षक प्रसारक मंडळाच्या वतीने १३१ नवउद्योजकांना रोजगाराची संधी तसेच स्वबळावर उभे राहण्याचे दृष्टीने मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्ताने महोत्सवाचे आयोजन करून विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

याबाबत सोमवार (दि. ११) सत्याग्रह महाविद्यालयात संस्थेचे संचालक डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन करून या महोत्सवाबाबत सविस्तर माहिती दिली. या वेळी प्राचार्य वनिता सूर्यवंशी, प्रा. संगीता जोगदंड आदी उपस्थित होते. डोंगरगावकर यांनी स्पष्ट केले की, २१ व्या शहतकातील आव्हाने पेलवणारे मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने संस्थेने आखलेले नवे प्रकल्प आणि उपक्रम याबाबत या वेळी माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे नवी मुंबईमध्ये येऊ घातलेले आंतराष्ट्रीय विमानतळ यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार, उद्योग



येणार आहेत. स्थानिक पातळीवर याकरीता जास्तीत जास्त उद्योजक घडणे गरजेचे असल्याने अशा नव्या उद्योजकांना मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. याकरीता जिल्हा उद्योजक प्रशिक्षण केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडियासारख्या योजनांची माहिती व प्रशिक्षण या शिबिरात दिली जाणार असल्याची माहिती डॉ. डोंगरगावकर यांनी दिली. १३ एप्रिल ते १३ मेपर्यंत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

१२ तास अभ्यास वाचन स्पर्धा, वक्तृत्व, निबंध स्पर्धा, विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा, ज्येष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, सामाजिक न्यायावर आधारित चर्चासत्र आदी कार्यक्रमांचा यामध्ये समावेश आहे.

# कोरोना काळात ऑनलाइन ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचा सत्कार

## सीकेटी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पालकांची कृतज्ञता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील सीकेटी विद्यालयाच्या प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या चौथीतील विद्यार्थ्यांना कोरोनाकाळात अव्याहतपणे ऑनलाइन आणि शक्य तेव्हा ऑफलाइनद्वारे ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शाळेतील सर्व शिक्षकांचा पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम नुकताच शाळेत पार पडला.



कोरोना महामारीमुळे शैक्षणिक प्रक्रियेवर मोठा परिणाम झाला. विषाणूच्या भीतीने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हित लक्षात घेत, शाळा-कॉलेजेस बंद ठेवण्यात आली. त्यामुळे या काळात विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन धडे देण्यास सुरुवात केली. आपल्या शाळेतील विद्यार्थी मागे राहून नये यासाठी त्यांना विशेष मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध स्पर्धा ऑनलाइन आयोजित करण्यात आल्या. त्यामुळे या महामारीच्या काळात घरात बसून कंटाळा आलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासात रुची वाढू लागली. त्यामुळेच शाळेच्या पहिली ते चौथीपर्यंतच्या सर्व शिक्षकांचा



विद्यार्थ्यांच्या पालकांकडून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी पालक प्रतिनिधी म्हणून संजय पाटील, सुधीर वाघमारे आणि नीलम तारे यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर वाघमारे यांनी केले. शिक्षकांकडून कोरोनाकाळात विद्यार्थ्यांना समृद्ध अध्यापनाचे धडे देण्यासाठी मेहनत घेतल्यानेच त्यांचे शिक्षण आजतागायत खंडित किंवा बंद झाले नाही, विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत आम्हाला वेळोवळी अवगत केले जाते, पालकांच्याही सूचनांचा विचार करून त्यात सुधारणा केल्या गेल्या. यामुळेच आमचे विद्यार्थी स्कॉलर आहेत, याचे सर्व श्रेय शिक्षकांचे असल्याचे मत पालक प्रतिनिधी सुधीर वाघमारे यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित शिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी सर्व उपस्थित पालकांचे आभार मानले. शिक्षकांप्रती असलेल्या प्रेमाखातर पालकांनी जो आमचा सत्कार केला, त्याचा मनापासून स्वीकार करून त्यांना धन्यवाद देते, असे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. तर परमजित कौर फगुरा, जसप्रित कौर सग्गु, बिना नायर, सुप्रिया ताम्हणकर, खरे, साक्षी पाटील आदींनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# पनवेल मनपामार्फत असंघटित कामगारांची ई-श्रम कार्ड नोंदणी

**पनवेल : वार्ताहर**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाअंतर्गत पनवेल महानगरपालिका आणि सीएससी यांच्यामार्फत असंघटित कामगारांची ऑनलाइन नोंदणी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाची सुरुवात मंगळवारी (दि. १२) कळंबोली येथील लेबर नाका, आंबेडकर भवन येथून करण्यात आली. या वेळी नाका कामगारांची ई-श्रम ऑनलाइन नोंदणी करण्यात आली.

या कार्यक्रमास उपायुक्त विठ्ठल डाके उपस्थित होते. त्यांनी यावेळी नोंदणी करताआलेल्या नाका कामगारांचा सत्कार केला. एका दिवसात कळंबोली येथे सुमारे १२५ कामगारांची नोंदणी या ठिकाणी करण्यात आली.

केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दि. ३१ डिसेंबर २००८ ला असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारीत केलेला आहे. या अंतर्गत असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा डेटाबेस तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाने दि. २६ ऑगस्ट २०२१ रोजी असंघटित कामगारांची नोंदणी करण्याकरिता ई-श्रम पोर्टल कार्यान्वित केले आहे. याची नोंदणी करण्याकरीता वय १६ ते ५९ वर्ष अशी पात्रता असून असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारी कोणतीही व्यक्ती यामध्ये नोंदणी करू शकते. फक्त नोंदणी करणारे कर्मचारी हे कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी आणि कर्मचारी राज्य विमा योजनेचे सभासद नसावेत. या नोंदणीसाठी आधार कार्ड, बँकेचे पासबूक, स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा भ्रमणध्वनी क्रमांक ही कागदपत्रे आवश्यक आहे. तसेच स्वयंनोंदणीकरीता कामगाराचा भ्रमणध्वनी क्रमांक आधार कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयंती महोत्सव; रिपब्लिकन पार्टीकडून अभिनंदन

**पनवेल : वार्ताहर**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गटाचे कोकण अध्यक्ष नगरसेवक जगदिश गायकवाड यांनी पनवेलमधील कामोठे वसाहतीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त चार दिवसांचा जयंती महोत्सव साजरा करण्याचा संकल्प केला आहे. याबद्दल स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

जयंती महोत्सव १४ ते १७ एप्रिलदरम्यान आयोजित केला आहे. या जयंती महोत्सवात विविध कार्यक्रम होणार आहेत. याबद्दल स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष साळुंखे यांनी नगरसेवक गायकवाड यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे 'स्वाभिमानी'च्य सर्व कार्यकर्त्यांना जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही साळुंखे यांनी केले आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणता कर प्रत्यक्ष कर आहे?**

***अ.*** जीएसटी ***आ.*** कंपनी कर
***इ.*** सीमा शुल्क ***ई.*** रस्त्यावरील टोल

**२. मार्च २०२२ ला संपलेल्या आर्थिक वर्षात देशात इतका विक्रमी कर वसूल झाला आहे.**

***अ.*** २७ लाख कोटी रुपये ***आ.*** १४ कोटी लाख रुपये
***इ.*** १२ लाख कोटी रुपये ***ई.*** ३० लाख कोटी रुपये

**३. भारतात ७ जुलै २०२१ रोजी सर्वाधिक वीज वापर झाला, तो किती होता?**

***अ.*** २०० गिगावॅट ***आ.*** २००.५७ गिगावॅट
***इ.*** १९९.२९ गिगावॅट ***ई.*** २०५ गिगावॅट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# सक्ती नव्हे, आग्रह

हिंदी ही काही संविधानाने ठरवून दिलेली राष्ट्रभाषा नाही हे सारेच जाणतात. त्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह अनभिज्ञ आहेत असे मानण्याचे काहीच कारण नाही. तरीही गृहमंत्री शाह यांनी संसदीय समितीसमोर बोलताना हिंदी भाषेच्या वापराबाबत आग्रही प्रतिपादन केल्यानंतर नवा वाद उकरून काढण्यात आला आहे. हिंदीचा वापर प्रादेशिक भाषांना नव्हे तर इंग्रजीला पर्याय म्हणून व्हायला हवा असे गृहमंत्री शाह यांचे म्हणणे होते. त्यांच्या या प्रतिपादनाला वेगळेच राजकीय रंग देण्याचा प्रयत्न सध्या होताना दिसतो.

**बहुविधतेतून एकता हे भारतीय समाजाचे सौंदर्य आहे. विविधतेने नटलेल्या आपल्या बहुभाषिक देशाला एका सूत्रात बांधण्याचे काम हिंदी सिनेमा आणि क्रिकेट या दोन घटकांनी केले. हिंदी ही काही भारतातील बहुसंख्याकांची बोलीभाषा नव्हे. सर्वसाधारणपणे ४३.६३ टक्के भारतीय लोकांची मातृभाषा हिंदी आहे असे २०११ साली झालेली जनगणना सांगते. याचाच अर्थ देशातील ५६ टक्के लोकांची मातृभाषा तसेच व्यवहाराची भाषा वेगवेगळी आहे आणि त्या प्रत्येक भाषेला आपापले संचित आहे, स्वत:ची अस्मिता आहे. यापैकी अनेक भाषांमधील साहित्य जगभरात गौरविले गेले आहे. केंद्र सरकारचा हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप दक्षिणेतील काही राजकीय नेत्यांनी नुकताच केला आहे. त्यांच्याबरोबर काही कलावंतही मैदानात उतरले आहेत. दक्षिणेतील राज्यांमध्ये हिंदी भाषेबद्दल असलेली अनास्था नवीन नाही. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनीही हिंदी भाषेचा आग्रह धरला होता, परंतु त्याविरोधात दक्षिणेत रण पेटले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या प्रतिपादनाचा विरोधकांनी सोयीस्कर विपर्यास केला आहे हे उघडच दिसते. भारतासारख्या देशामध्ये इंग्रजी भाषेऐवजी हिंदी प्रचलनात आणावी एवढाच त्यांचा आग्रह आहे. प्रादेशिक भाषांना नख लावण्याची त्यांची अजिबात इच्छा नाही. भारतामध्ये ४० टक्क्यांहून अधिक लोक हिंदीचा वापर मुबलक प्रमाणात करतात कारण ती त्यांची मातृभाषाच आहे. उरलेल्या बहुभाषिकांमध्ये हिंदीचा वापर कमी-अधिक प्रमाणात होतच असतो. महाराष्ट्रात कोठेही गेले तरी मराठीतच बोलले जाते हे खरे, परंतु मुंबई-पुण्यासारख्या महानगरांमध्ये साधी ऑटोरिक्षा थांबवायची म्हटले तरी थोडाफार हिंदीचा वापर होतोच. हाच मराठी माणूस कामाच्या अथवा सहलीच्या निमित्ताने कन्याकुमारीला जरी गेला तरी त्याला हिंदीतूनच संवाद साधणे भाग पडते. केरळसारख्या राज्यामध्ये साक्षरता अधिक असल्याने इंग्रजी भाषेचे प्रचलन आहे. दक्षिणेतील काही अपवादात्मक जागा वगळता वापरातील सर्वसामान्य भाषा म्हणून भारतीय माणसाने हिंदी भाषेचा स्वीकार मनोमन केलेला असतोच. इंग्रजी ही कितीही समृद्ध असली तरी ती शेवटी परकीय भाषा आहे हे विसरून चालणार नाही. इंग्रजीपेक्षा हिंदी भाषा ही अधिक आपली आहे हे अमान्य कसे करावे? भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर बहुतेक राज्यांना स्वत:च्या मातृभाषेत कारभार करण्याची मोकळीक मिळाली. त्या मातृभाषेचा संपूर्ण आदर राखूनच गृहमंत्री अमित शाह यांनी हिंदीचा वापर वाढवण्याचा उपाय सुचवला आहे. याकडे राजकीय नजरेने बघणे चुकीचे ठरेल. हिंदी ही सरकारी कामाची भाषा तर आहेच, परंतु चित्रपट आणि क्रिकेट याप्रमाणेच भारतीय समाजाला कळत-नकळत जोडणारा एक दुवादेखील आहे एवढेच गृहमंत्री अमित शाह यांचे म्हणणे आहे.**

# छोट्या धंद्यांना बळ देण्यासाठी अनोखा प्रवास

**खबरबात**
**नितीन देशमुख**

आम्ही झिलबाम बॉर्डरवर निघालो होतो. नुमडा या मणीपूर राज्यातील एका गावाजवळ रात्री ८ वाजता पोहचलो. सगळे बंद झाले होते, कारण नॉर्थ ईस्टमध्ये थंडीत सूर्यास्त लवकर म्हणजे ३-४ वाजताच होतो. रस्त्यात एका ठिकाणी काही पोलिस होते. त्यांच्या जवळ राहण्याची सोय कोठे होईल चौकशी केली. त्यांनी प्रथम आमचीच चौकशी केली आम्ही टुरिस्ट असल्याची खात्री पटल्यावर येथे सोय नसल्याचे सांगितले. त्यांना आम्ही पुन्हा विनंती केल्यावर त्यांनी गावात एका ठिकाणी फोन लावला. मग एका उंचावरच्या ठिकाणी गाडी जात नसल्याने आमची बॅग स्वत: हातात घेऊन आम्हाला तेथे घेऊन गेले. एका पत्र्याच्या घरात आमची सोय करण्यात आली. मणिपूर पोलिसांनी त्या अंधाऱ्या रात्री भाषेचा प्रॉब्लेम असताना ही आमच्या सारख्या अनोळखी माणसांना केलेली मदत आम्ही कधीच विसरू शकणार नसल्याचे द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलचे कौस्तव घोष व लक्ष्मी सोरते सांगत होत्या.

सपोर्ट युअर बिझनेस या आशयाच्या माध्यमातून सर्व पार्श्वभूमीतील लोकांना सक्षम करणे आणि त्यांच्यासाठी त्यांच्या व्यवसायाचा प्रचार आणि वाढ करण्यासाठी नेटवर्क स्थापन करण्याचे ध्येय आहे. जे एक नेटवर्क प्लॅटफॉर्म आहे, ज्याचे नेतृत्व संस्थापक संचालक रिंकी वनमोरे, मदिहा शेख आणि कौस्तव घोष करतात. मोहिमेचे कारण लहान व्यवसायांना पाठिंबा देणे आणि त्यांचे ब्रँड आणि प्रयत्न ओळखणे हे असून द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल या मोहिमेमध्ये एक संघ असून त्यामध्ये कौस्तव घोष हे संस्थापक, लक्ष्मी सोरते सह-संस्थापक, आर्या नायर जनसंपर्क आणि विपणन, भाविक देशमुख नेव्हिगेटर, अनित कौर बंगा विचारवंत, संशोधन आणि विकास, रितांशू शर्मा मीटिंग समन्वयक, सावराब समता वेबसाइट विकासक, तरुण मिश्रा ग्राफिक डिझायनर/व्हिडीओ मेकर, अभिषेक वाळेकर वाहन ब्रँडिंग, शीतल सिरसीकर वाहन ब्रँडिंग म्हणून काम पाहतात.



कौस्तव घोष मूळचे कलकत्ताचे असले तरी आता खारघरचे रहिवासी आहेत. ते स्वत: इलेक्ट्रिकल इंजिनियर आहेत. त्यांनी एनजीओमध्येही काम केले आहे. मार्केटिंग सल्लागार म्हणूनही काम करत होते. लक्ष्मी सोरते या फ्री लान्सर कमर्शियल आर्टिस्ट आहे. दोघांना फिरण्याची खूप आवड असल्याने त्यांना संपूर्ण देश सोबत फिरायचा होता, पण तो एका उद्देशाने फिरायचा होता. कोरोना काळात त्यांनी स्वत: छोट्या धंद्यांना आलेल्या अडचणींचा अनुभव घेतल्याने त्यांनी छोट्या धंद्यांचा प्रचार आणि वाढ करण्यासाठी फिरण्याचे ठरवून द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल ही १०१ दिवसांची रोड ट्रिप मोहीम काढली. कोविडमुळे प्रभावित झालेल्या लहान आणि सूक्ष्म व्यवसायांना मदत करण्यासाठी, करण्याचे ठरवले. सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील संस्कृती, परंपरा, रितीरिवाज, पाककृती अशा विविध बाबतीत ही ट्रीप प्रेरक ठरली. एनजीओ व स्टार्ट अप्स आणि लहान व्यावसायिक समुदायांसारख्या विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमधील ८००पेक्षा जास्त समविचारी लोकांच्या यावेळी भेटी झाल्या व त्यामध्ये एकमेकांचे विचार समजून घेता आले.





कौशल व लक्ष्मी यांना द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलसाठी होंडा कंपनीने गाडी दिली होती. बाकी खर्च त्यांनी आपल्या स्वत:च्या बचतीतून केला. काही ठिकाणी रोटरी सारख्या संस्थांनी मदत केली. ते २८ राज्य आणि ५ केंद्रशासीत प्रदेश फिरले. सुरुवात कोकणातून केली. कोकणी मसाले, लोणची व सरबते त्यांना आवडली. तेथील माणसांची पाहुण्यांना मदत करण्याची वृत्ती लक्षात राहिल्याचे ते सांगतात. छत्तीसगड म्हटला की, आपल्या समोर नक्षलवादी येतात. अनेकांनी तेथे कशाला जाता सांगितले तरीही अनुभव घ्यायचा ठरवून आम्ही गेलो. आम्ही तेथील एका एनजीओमार्फत जंगलात एका आदिवासी कुटुंबासोबत राहिलो. त्यांच्याकडे औस्ट्रेलियन फेमस शेफ गार्ड्न रामसे, बिल गेटची मुलगी ही येऊन राहिली होती. त्यांनी आम्हाला सर्वसाधारण टुरिस्ट जाऊ शकत नाहीत त्याठिकाणी नेले तो अनुभव रोमांचकारी होता.

जम्मू काश्मीरमध्ये राहण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरुन ओळख झालेल्या एका मुस्लिम कुटुंबाने आमंत्रण दिले होते. त्या ठिकाणी रस्ता नीट नाही. तिकडे फारशी माणसे नाहीत तुम्ही जाऊ नका असा आम्हाला सल्ला मिळाला, पण तरीही आम्ही तेथे गेलो. अनोळखी शफ्तंजी कुटूंबासोबत एक रात्र राहिलो होतो. त्या वेळी बर्फ पडत असल्याने थंडी होती. एका खोलीत बुखारी (शेकोटी) होती. त्या खोलीत गरम होते तेथे बसून त्यांच्या कुटुंबासोबत गप्पा मारल्या. मीठ घातलेला चहा घेतला. त्यांची मेहमान नवाजी अनुभवली दुसऱ्या दिवशी सकाळी निघाल्यावर त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. ते म्हणाले, आम्ही शहरापासून लांब राहतो आमच्यावर काश्मिरी हा शिक्का आहे, त्यामुळे आमच्याकडे कोणी येत नाही. आमचे नातेवाईक ही येत नाहीत. आमच्या मुली बाहेर जाऊ शकत नाहीत अशावेळी तुम्ही आमच्याकडे येऊन राहिलात हे आमच्यासाठी खूप आहे. त्यांचा पाहुणचार आम्ही कधीच विसरू शकणार नसल्याचे लक्ष्मी सोरतेनी सांगितले.

द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल ही १०१ दिवसांची ट्रीप केल्यावर लक्षात येते की, आपल्या देशात अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी छोट्या उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने आमच्यासारख्या फ्लॅटफार्मना बळकटी दिली पाहिजे. आम्ही लोकांना एकत्र आणतोय त्यांना मार्केट मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहोत. आम्हाला शासनाने सहकार्य केले तर खूप काही होऊ शकते असे कौशल घोष यांना वाटते.

# दिलीप प्रभावळकरांचा हास्य चौकार!



**प्रासंगिक**

अभिनयातील सहजता, नेमकेपणा, भूमिका निवडीतील चोखंदळपणा व स्वीकारलेल्या भूमिकांना न्याय देण्याची वृत्ती, अभिनय व लेखन या दोन्ही कलांनी मराठी नाट्य-चित्रपटक्षेत्रात आणि साहित्यक्षेत्रातही स्वत:च्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीनिशी दिलीप प्रभावळकर यांनी आपले बळकट स्थान निर्माण करून प्रदीर्घ नाट्य-चित्र कारकिर्दीत घडवून प्रेक्षकांच्या मनावर अनेक दशके राज्य केले आहे. विनोदी लेखनाची प्रचंड आवड असलेल्या प्रभावळकरांच्या साहित्य निर्मितील खट्याळ, मिश्कील, निरागस, खुमासदार शैलीद्वारे वाचक - श्रोत्यांसोबत संवाद साधण्याच्या विशेष हातोटीमुळे त्यांचा एक विशेष वाचक-रसिकवर्ग जगभर तयार झाला आहे. त्यांच्यासाठी विशेष आनंदाची बाब म्हणजे 'स्टोरीटेल'ने नुकतेच त्यांच्या चार वेगवेगळ्या धाटणीचे लेखसंग्रह ऑडिओ स्वरूपात आणले आहेत. या सर्व लेखांचे सादरीकरण प्रत्यक्ष प्रभावळकरांच्याच आवाजात ऐकायला मिळत असल्याने हा एक दुग्धशर्करा योग म्हणता येईल.

क्रिकेट, खेळाडू, खेळाडूंचं वर्तन, मैदानाबाहेरील घडामोडी अशा अनेक गोष्टींवर प्रभावळकरांनी खुमासदार लेख लिहिले. खळखळून हसायला लावणारे, वरकरणी मनोरंजनात्मक भासणारे हे लेख विसंगती टिपणारे आणि चिमटे काढणारेही आहेत. या लेखांचा संग्रह म्हणजे 'नवी गुगली'. 'षट्कार' या क्रीडा-मासिकात दिलीप प्रभावळकर यांनी लिहिलेल्या तुफान विनोदी लेखांचा संग्रह म्हणजे 'गुगली' हा महत्त्वाचा ऐवज खास स्टोरीटेलच्या श्रोत्यांसाठी दस्तुरखुद्द प्रभावळकरांच्याच आवाजात ऐकताना धम्माल मनोरंजन होते. यासोबतच त्यांचा विनोदी ललित लेखसंग्रह 'हसगत' ऐकतानाही अशीच मजा येत राहते.

आपल्या आजूबाजूच्या घटनांचा तिरकस लेखणीतून घेतलेला वेध... हे या पत्रापत्रीचं स्वरूप. तात्यासाहेब आणि माधवराव या जोडीगोळीच्या साहाय्याने दिलीप प्रभावळकर हा पत्रप्रपंच मांडतात. यात कधी या दोघांचा रशियावारीतला पराक्रम हसवतो; तर कधी आफ्रिकावारीतले 'उदयोग' हसू आणतात. याच पत्रांतून कधी आयपीएलवरचं भाष्यं समोर येतं, तर कधी होर्डिंग्जच्या सुळसुळाटासंबंधीचं तिरकस मत...तात्कालिक घटनांकडे पाहण्याचा प्रभावळकरांचा मिश्किलपणा या 'पत्रापत्री'त रंगत आणतो. या सर्व विविधांगी मनोरंजन करणाऱ्या कथा स्वतः प्रभावळकर आपल्या शेजारी बसून आपल्याला ऐकवत आहेत असा भास ऐकणाऱ्याला होत राहतो.

**-राम कोंडीलकर**



**मुरूड : काशिद समुद्र किनाऱ्यावरील टेकडी पर्यटकांना नेहमीच भावते. या ठिकाणी पर्यटक नेहमीच आवर्जून भेट देत असतात. ही टेकडी आणि परिसराची सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.**

**क्लिक...क्लिक...!**

## बदलते तंत्रज्ञान

### वॉटरप्रूफ स्मार्टवॉच

तुम्ही नियमितपण आरोग्याची काळजी घेत असाल, त्याबद्दल सजग असला तर हे Smart Watch For Men तुमच्याकडे असायलाच हवेत. यात वेगवेगळ्या ट्रॅकरसोबतच बरेचसे स्मार्ट फीचर्स दिले आहेत. त्यामुळे तुम्ही नेहमीच अपग्रेडेड रहाल. या स्मार्ट वॉचमध्ये तुम्ही स्मार्टफोनमधील मेसेज आणि नोटिफिकेशनसुद्धा वाचू शकता.

आज आम्ही तुम्हाला सर्वोत्तम आणि लेटेस्ट फिचर्सच्या Smart Watch For Men च्या बद्दल माहिती देणार आहोत. Smart Watch For Men तुमचे हार्ट रेट, रनिंग ट्रॅकिंग, स्टेप काऊंट सोबतच एकुणच आरोग्याचा ट्रॅक ठेवते. हे स्मार्टवॉच तुमच्या स्मार्टफोन सोबतही कनेक्ट करता येतात. तुम्ही जिम किंवा वर्क आउट करत असाल, तर हे Smart Watch For Men तुमच्यासाठी अतिशय लाभदायक ठरतील. धकाधकीच्या सध्याच्या जगात आरोग्याची संपूर्ण माहिती ठेवणारं हे गॅजेट सतत तुमच्यासोबत असायला हवं. हे स्मार्टवॉच तुमचे फिटनेसचे लक्ष्य गाठण्यात तुमचा सच्चा साथीदार असेल. इथे आम्ही तुम्हाला ब्रँडेड आणि बेस्ट फीचर्सच्या स्मार्ट वॉचेसबद्दल माहिती देत आहोत.




Fire-Boltt SpO2 Full Touch 1.4 inch Smart Watch :

या सर्वोत्तम Smart Watch For Men मध्ये लेटेस्ट SP O2 फंक्शनसुद्धा आहे. यामध्ये हार्ट रेट सेन्सर सोबतच तुम्ही रिअल टाईम हार्ट रेट चेक करू शकता. या स्मार्ट वॉचला फुल टच डिस्प्ले आणि फॅशनेबल मेटल बॉडी आहे. सोबतच हे स्मार्ट वॉच वॉटर रेझिस्टन्स टेक्नॉलॉजीने बनवले गेले आहे, त्यामुळे ते पावसामुळे खराब होत नाही.


Noise ColorFit Pro 2 Full Touch Control Smart Watch : या लेटेस्ट Smart Watch For Men मध्ये १.३ इंची फुल कैपेसिटिव टचचा डिस्प्ले आहे. यात टॅप आणि स्वाईप जेस्चर सपोर्टसुद्धा आहे. जो तुम्हाला स्मार्ट एक्सपिरिअन्स देतो. यात २४÷७ हार्ट रेट मॉनिटर आहे, जो प्रत्येक पाच मिनिटाला तुमचा हार्ट रेटला चेक करत असतो. सोबतच यात नऊ प्रकारचे स्पोर्ट मोडसुद्धा आहेत. जे व्यायाम करताना फारच फायदेशीर ठरतात.

## आरोग्य प्रहर



### पाणी पिण्याची योग्य सवय

पाणी आपल्यासाठी खूपच महत्त्वाचे आहे असे म्हणतात आपल्या शरीराचा ७० टक्के भाग पाण्याने बनला आहे. आरोग्य तज्ज्ञदेखील दिवसातून तीन ते चार लीटर पाणी पिण्याचा सल्ला देतात, परंतु डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार जेवताना पाणी पिणे टाळायला हवे. जेवताना किंवा जेवल्यानंतर लगेचच पाणी प्यायल्याने ॲसिडिटी, पोट फुगणे यासारख्या समस्या जाणवू शकतात. ज्या व्यक्ती जेवल्यावर लगेचच पाणी पितात त्यांना आरोग्यविषयक अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो.



**जेवल्यानंतर किती वेळाने पाणी प्यावे?**

आरोग्य तज्ज्ञांनुसार खाल्लेले अन्न पचायला जवळपास दोन तास लागतात. यादरम्यान पाणी प्यायल्याने पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच जेवल्यावर किमान ४५ ते ५० मिनिटांनंतर पाणी प्यायला हवे तसेच जेवायच्या अर्धा तास आधी पाणी प्यावे.

**योग्य वेळी पाणी प्यायचे फायदे कोणते?**

जेवल्यानंतर एक तासाने पाणी प्यायल्याने वजन नियंत्रणात राहते.

योग्य वेळी पाणी प्यायल्याने पचनक्रिया बरोबर आणि मजबूत राहते.

पोटात गॅस आणि ॲसिडिटीची समस्या होणार नाही.

शरीर अन्नातील पोषक तत्व चांगल्या प्रकारे शोषून घेते.

योग्य वेळी पाणी प्यायल्याने चांगली झोप येण्यास मदत होते.

**जेवल्यानंतर लगेचच पाणी पिण्याचे तोटे कोणते?**

लठ्ठपणा, पचन समस्या, रक्तातील साखरेचे प्रमाण वाढण्याची समस्या, पोटात गॅसची समस्या.

पाणी म्हणजे जीवन म्हटले आहे. पाणी पिणे आवश्यकच आहे, पण ते कधी आणि कसे प्यावे हेसुद्धा महत्त्वाचे आहे.

(येथे देण्यात आलेली माहिती गृहितके आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)

# ओएनजीसीकडून मच्छीमारांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी साकडे

## आमदार रमेश पाटील यांनी घेतली केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांची भेट

**मुरुड : प्रतिनिधी**
**ओएनजीसीच्या ससेमिक सर्व्हेच्या काळात मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्याची मच्छीमार बांधवांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष भाजप आमदार रमेश पाटील यांनी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिपसिंग पुरी यांच्याकडे केली.**

खोल समुद्रात तेल शोधण्यासाठी ओएनजीसी मार्फत ससेमिक सर्वे केला जातो. त्यात समुद्राच्या तळाशी मोठमोठ्या वायर टाकून स्फोट केले जातात. या स्फोटामधून तेल बाहेर आल्यास कंपनीस मोठा आर्थिक फायदा होतो. मात्र हा सर्वे केला जातो, त्यावेळी त्या भागातील मच्छिमारी पूर्णतः बंद केली जाते. किमान दोन ते अडीच महिने मच्छिमारी बंद केल्यामुळे स्थानिक मच्छिमारांना मोठे नुकसान सोसावे लागते. याबाबत मच्छिमारांच्या तक्रारी प्राप्त होताच आमदार रमेश पाटील त्यांनी शिष्टमंडळासह केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिपसिंग पुरी यांची दिल्लीत भेट घेतली.व मच्छीमारांची कैफियत मांडली.


(छाया : मिलिंद कापड)

गेल्या दहा वर्षांपासून पालघर व रायगड जिल्ह्यात ओएनजीसी मार्फत ससेमिक सर्व्हे होत असल्यामुळे तेथील स्थानिक मच्छीमार बांधवांचे खूप नुकसान होत आहे. आधीच नैसर्गिक आपत्ती व कोरोनामुळे मच्छीमार बांधव बेजार झाला असून त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यात जून, जुलै या दोन महिन्यात मासेमारी बंदी असते मात्र शासनाकडून मच्छीमारांना कोणतीही मदत मिळत नाही. त्यामुळे ससेमिक सर्व्हेच्या काळात मच्छीमार बांधवांचे होणारे नुकसान लक्षात घेता त्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आमदार रमेश पाटील यांनी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिपसिंग पुरी यांच्याकडे केली. यावर मंत्री महोदयांनी चौकशी करून त्यामध्ये मच्छीमार बांधवांचे नुकसान होत असल्याचे आढळून आले तर नुकसान भरपाई देण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## तीन आमदार, पालकमंत्री, खासदार तरीही रोहा-अलिबाग रस्ता बेकार

प्रवाशांचे हाल

**रोहे : प्रतिनिधी**
रोहा-अलिबाग रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. या मार्गावरील सानेगाव फाटा (निडी) ते डोंगरी, करंजविरा ते चिंचोटी या भागात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून नागरिकांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत आहे. या महत्वाच्या व प्रवाशांच्या जिव्हाळ्याच्या विषयाकडे लोकप्रतिनिधी लक्ष घालणार का, असा सवाल समोर येत आहे.

रायगड जिल्ह्याची राजधानी असलेल्या अलिबागला जाण्यासाठी रोहा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर या तालुक्यातील नागरिकांना जवळचा मार्ग म्हणून रोहा-अलिबाग रस्ता सोयीचा ठरतो. हा रस्ता दुरूस्त व्हावा, नागरिकांची मागणी आहे. परंतु श्रेयवाद व आरोप-प्रत्यारोपात अडकलेल्या नेतेगणांमुळे हा रस्ता अद्याप दुर्लक्षित राहिला आहे. आता काही प्रमाणात अलिबाग ते वावे रस्ता चांगला झाला आहे. मात्र उर्वरित रस्त्याची चाळण झाल्याचे दिसून येते.

रोहा-अलिबाग हा रस्ता ज्यांच्या विधानसभा मतदार संघात येतो ते आमदार महेंद्र दळवी, विधान परिषदेचे आमदार जयंत पाटील, आमदार अनिकेत तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे या लोकप्रतिनिधींचे या रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष का जात नाही, हा मोठा प्रश्न नागरिकांना पडला आहे. महत्वाचे म्हणजे हे सारेच नेते रस्ता मंजुर झाला आहे. लवकरात लवकर होईल, आम्ही आंदोलन केले आहे. त्याला यश मिळाले आहे. हा रस्ता होणार अशी अनेक आश्वासने देतात. मात्र गेली कित्येक वर्षे हा रस्ता आहे तसाच राहिला आहे.

मधला भाग वगळता रोहा-अलिबाग रस्त्याची चाळण झाली आहे. वाहन चालकांना आपला जीव मुठीत घेवून वाहन चालवावे लागते. खड्डे चुकविताना या रस्त्यावर अनेकदा छोटे-मोठे अपघात झाले आहेत. या रस्त्यावरून नियमीत प्रवास करणाऱ्यांना विशेषत: कमरेचे आजार झाले आहेत. रोहा-अलिबाग हा रस्ता कधी होणार, मंजूर आहे मग का होत नाही, जिल्ह्यातील अन्य रस्ते होत असताना हा रस्ताच का रखडला असे अनेक प्रश्न विचारले जात असताना या रस्त्याकडे साऱ्याच स्थानिक नेत्यांचे दुर्लक्ष झाले एवढे निश्चित. आता पावसाळा सुरू होण्यास दीड ते दोन महिने शिल्लक आहेत. या दरम्यान हा रस्ता होण्याची गरज आहे. एकदा का पावसाळा सुरू झाला की, हा रस्ता दुर्लक्षित होणार आहे. त्यामुळे या साऱ्याच लोकप्रतिनिधींनी आपली राजकीय ताकत वापरून हा रस्ता येत्या पावसाळ्याआधी सुस्थितीत करावा, अशी मागणी होत आहे.


(छाया : महादेव सरसंबे)

## रायगडात ७ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालत

**अलिबाग : जिमाका**
महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि. ७ मे) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. संदीप वि. स्वामी यांनी सांगितले.

न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, दिवाणी अपिले, नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे तसेच भारत संचार निगम लिमिटेड, वीज वितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था इतर थकबाकी बाबतची वादपूर्व प्रकरणे व राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यय होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. न्यायालयात भरलेले शुल्क परत मिळते. त्यामुळे ७ मे २०२२ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष विभा इंगळे यांनी केले आहे.

## डिजिटल स्वदेस उपक्रमांतर्गत पोलीस पाटीलांना मार्गदर्शन



**अलिबाग : प्रतिनिधी**
रायगड जिल्हा पोलीस व स्वदेस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल स्वदेस उपक्रमांतर्गत पोलीस पाटील यांचे हक्क व कर्तव्य या विषयावर झूम मीटिंग च्या माध्यमातून अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी जिल्ह्यातील पोलीस पाटीलांना मार्गदर्शन केले.

या वेळी स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी व जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील उपस्थित होते.

पोलीस पाटीलांचा क्षमता बांधणी हा कार्यक्रम वर्षभर सुरू राहणार असून त्यामध्ये शासकीय योजना, नाविन्यपूर्ण उपक्रम व विविध विषयावर प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला पोलीस पाटीलांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## कर्जतमध्ये निबंध, वक्तृत्व स्पर्धा

**कर्जत : बातमीदार**
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कर्जत नाना मास्तरनगर येथील फुले शाहू आंबेडकर विचारमंच या संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कर्जत तालुका शाळा नंबर एक येथे घेण्यात आलेल्या या स्पर्धेत कर्जत शहर व परिसरातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. दोन गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेसाठी इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यासाठी राष्ट्रकार्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान हे विषय देण्यात आले होते. .

कर्जतमधील सुमंतु हॉस्पिटलचे डॉ. सुनील ढवळे यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार रमेश खैरे आणि ॲड. तुकाराम ढोले, कार्याध्यक्ष विजय जगताप, शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष मनोहर भोसले, सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र जाधव, अमोल रोकडे, शुभम अष्टेकर, सिद्धार्थ ढोले, अल्पेश मोरे आदी पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मालू गायकवाड यांनी केले तर शिवाजी कावरे यांनी आभार मानले. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.



(छाया : संतोष पेरणे)

## राष्ट्रीय भूमापन दिनानिमित्ताने नियोजन भवनात कार्यक्रम



**अलिबाग : प्रतिनिधी**
१० एप्रिल हा दिवस राष्ट्रीय भूमापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्या निमित्ताने रायगड जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरावर भूमापन दिनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात भूमापनाचे महत्त्व सांगून भूमी अभिलेख व महसूल विभाग यांनी एकत्र येऊन सामान्य जनतेला न्याय देण्याबाबत आवाहन केले. त्याचप्रमाणे सामान्य जनतेची व शासकीय मोजणी कामे, भूसंपादन मोजणी कामे वेळेवर पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून उपलब्ध आधुनिक साहित्याचा वापर करण्याबाबत आग्रही सूचना केली. अत्याधुनिक रोव्हर मशिन उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही दिले.

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी यांनी प्रास्ताविकात भूमापन दिनाचे महत्व व इतिहास विशद करून मागील वर्षभरात केलेल्या कामाबाबत, वेगवेगळ्या प्रकल्पांबाबत माहिती दिली.

या कार्यक्रमात उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील उल्लेखनीय काम केलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास एमआरएसएसी नागपूर येथील वरिष्ठ वैज्ञानिक संजय पाटील, उपअधीक्षक विजय भालेराव (पनवेल), इंद्रसेन लांडे (कर्जत), योगेश कातडे (म्हसळा), गणेश राठोड (उरण), काशिनाथ मोरे (पाली) व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार अलिबाग उपअधीक्षक भूमी अभिलेख प्रदीप जगताप यांनी केले.

कुळगांव बदलापूर नगरपरिषद
जा.क्र. : कुबनप/साबां/कक्ष-६/३१०१/२०२२-२३ दिनांक :- १२/०४/२०२२
**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०६/२०२२-२३**
कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत वार्ड क्र. ११ कुळगाव नगर परिषद हद्दीतील कात्रप गावातील रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे या कामासाठी शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. १३/०४/२०२२ ते दि. ०७/०५/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत आहे. सदर निविदा दि. ०९/०५/२०२२ रोजी दुपारी १२:०० नंतर उघडण्यात येतील.
निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.
सही/-
(योगेश गोडसे)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव

मा. श्री. गोडसे साहेब कोर्ट
प्रोसेस जमा ता.
**जाहीर नोटीस**
ॲड. इर्शाद आर. शेख पनवेल
अर्जदारांचे वकील
**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात.....**
दि.चौ.अर्ज. क्र. ५२५/२०२२
नि ७/ड
ने.ता. १८/६/२०२२
१) श्रीमती. मुनिरा फिरोज शिकोरा, वय-४८ वर्षे, धंदा-गृहिणी,
२) अम्मार फिरोज शिकोरा, वय-२३ वर्षे, धंदा-शिक्षण
३) हुझेफा फिरोज शिकोरा, वय-१५ वर्षे, धंदा-शिक्षण
कं. १ स्वत:करीतां व क्र. ३ चे अज्ञान पालन करणार
आई म्हणुन सर्व रा. ४०३, हरि ओम बामा को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट नं. ६१, सेक्टर १८, खारघर, जि. रायगड, } अर्जदार
तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडिल **पै. फिरोज अहसान शिकोरा** हे आचार्य श्री नरेश हॉस्पीटल, सीबीडी बेलापुर, येथे दिनांक ०२/०५/२०२१ रोजी पैगंबरवासी झाले आहेत. **पै. फिरोज अहसान शिकोरा** यांची आई म्हणजेच अर्जदार क्र. १ यांची सासु आणि अर्जदार क्र. २ व ३ यांची आजी पै. कुलसुम अहसान शिकोरा या देखील दि. २८/०४/२०२१ रोजी डॉल्फीन हॉस्पीटल, खारघर येथे पैगंबरवासी झाल्या आहेत. पै. कुलसुम अहसान शिकोरा यांचे पती पै. अहसान अब्दुल्लाभाई शिकोरा हे देखील दि. ०८/०८/२०११ रोजी पैगंबरवासी झाले आहेत. पै. कुलसुम अहसान शिकोरा यांस त्यांचे मृत्यूपश्चात पै. फिरोज अहसान शिकोरा हा मुलगा यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारसदार नाहीत. म्हणजेच पै. कुलसुम अहसान शिकोरा आणि पै. फिरोज अहसान शिकोरा यांस मृत्युपश्चात त्यांना मुस्लिम कायद्यांतील तरतुदींनसार अर्जदार क्र. १ ते ३ हेच कायदेशीर वारसदार आहेत. श्रीमती, मुनिरा फिरोज शिकोरा वगैरे ह्यांनी **पै. फिरोज अहसान शिकोरा व पै. कुलसुम अहसान शिकोरा** यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.
पै. कुलसुम अहसान शिकोरा आणि पै फिरोज अहसान शिकोरा यांच्या नावे असलेल्या स्थांवर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :
मौजे-खारघर, ता. पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर १८, मधील सिडको भुखंड क्र. ६१, वरील हरि ओम बामा को.ऑ.हौ.सो., या इमारतीचे चौथ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ४०३, क्षेत्र ८१५ चौ फुट बिल्टअप अशी मिळकत.
सदरहू वर नमुद निवासी सदनिकेच्या मिळकतीमध्ये अर्जदार क्र. १, पै. कुलसुम अहसान शिकोरा आणि पै. फिरोज अहसान शिकोरा यांचा सामाईकांत प्रत्येकी १/३ अविभक्त हिस्सा आहे.
वर श्रीमती. मुनिरा फिरोज शिकोरा वगैरे ह्या **पै. फिरोज अहसान शिकोरा व पै. कुलसुम अहसान शिकोरा** यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्रीमती. मुनिरा फिरोज शिकोरा वगैरे, यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर **पै. फिरोज अहसान शिकोरा व पै. कुलसुम अहसान शिकोरा** यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.
आज दिनांक १२ एप्रिल २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
सही/- लिपिक दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल

## कर्जतमधील कडाव येथे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त धार्मिक सोहळा



**कर्जत : बातमीदार**
कडाव येथील ऐतिहासिक श्रीराम मंदिरात गुढीपाडवा ते रामनवमीपर्यंत श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी श्री रामरक्षा व मारुती स्तोत्र पठण, त्रयोदशाक्षरी श्री रामजप करण्यात आले. तसेच शेवटच्या तीन दिवस महिलांसाठी चैत्रगौरीचे श्रीराम पंचायतन यज्ञ, घोष वादन तसेच सलग तीन दिवस प्रसिद्ध किर्तनकार श्रीराम महाराज पुरोहित यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. रामनवमीच्या दिवशी भगवान श्रीरामांची भक्ती भावाने षोडशोपचारे पुजा करण्यात आली. त्यानंतर श्रीराम जन्माचे कीर्तन होऊन महाप्रसादाच्या कार्यक्रमाने श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याची सांगता करण्यात आली.



## कोलिवली शाळेत संगणक कक्षाचे उद्घाटन



**कर्जत : बातमीदार**
तालुक्यातील वाकस केंद्राच्या वतीने कोलिवली येथील प्राथमिक शाळेमध्ये पालक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत शाळापूर्व तयारी मेळावा घेण्यात आला. या वेळी शाळेत नव्याने निर्माण केलेल्या संगणक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

कोलिवली येथील प्राथमिक शाळेमध्ये शाळा पूर्व तयारी कार्यक्रमाचे उद्घाटन वाकस ग्रुपग्रामपंचायतीच्या सरपंच सुदर्शना तांबोळी यांच्या हस्ते झाले. गावात लेझीम, ढोल-ताशे यांच्या गजरात दिंडी काढण्यात आली होती. त्यानंतर शाळेत नव्याने सुरू करण्यात आलेल्या संगणक कक्षाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संभाजी डांगरे यांच्या हस्ते झाले. या वेळी नवीन दाखलपात्र विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक एन. डी. म्हात्रे यांनी दान बालगीते सादर केली. शाळेतील दाखलपात्र बालकांना मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या वेळी वाकस शाळेच्या शिक्षिका पाटील, नेवाळी शाळेचे शिक्षक जोगदंड यांच्यासह विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**
सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत बोजावीरहीत तीचे मालक १) श्री प्रकाश बळीराम कदम, २) श्री सुनील बळीराम कदम, ३) श्रीमती निराबाई बाबुराव कदम, ४) श्रीमती सुरेखा सुभाष मोरे, ५) श्रीमती रजनी रमेश शिंदे, ६) श्रीमती सिमा सुधीर चव्हाण, ७) श्रीमती रिमा राजेंद्र मोरे, ८) श्री संजय बाबुराव कदम, सर्व रा. रोहीजण, ता. पनवेल, जि. रायगड, यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्याबाबतचा आवश्यक तो व्यवहार माझे अशिलांनी सदरहु मालकांबरोबर ठरविलेला आहे.
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- रोहीजण, ता. पनवेल, जि. रायगड, येथील शेतजमीन मिळकत -**

| अनु क्र. | सर्वे नं. | क्षेत्र हे. आर. प्र. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. | २४/अ/४ | एकुण क्षेत्र ०-५१-० हे. आर. पॉ. पैकी पुर्व दिशेकडील ०-२५-५ हे. आर. पॉ. इतके क्षेत्र | १.२६ |

या सदरहु मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल विक्रिचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
नवी मुंबई
दिनांक- १२/०४/२०२२
सही/-
**ॲड. नवीन वी. धोंगडी**
**पत्ता**-फ्लॅट नंबर डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.
मो.क्र.९००४०८७८७३

## निवडक



### डेंटकॉन २०२२ दंत परिषद उत्साहात

**पनवेल** : पनवेल डेंटल वेलफेअर असोसिएशनच्या वतीने डेंटकॉन २०२२ ही भव्य दंत परिषद नुकतीच विसावा रिसॉर्ट येथे झाली. या वेळी पनवेल, रायगड, नवी मुंबई येथील २५० पेक्षा जास्त दंतवैद्य उपस्थित होते. डेंटल काउन्सिल ओफ महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे यांच्या हस्ते व गव्हर्नमेंट डेंटल कॉलेज मुंबईच्या प्रमुख डॉ. डिंपल पाडावे यांच्या उपस्थितीत या परिषदेचे उद्‌घाटन झाले. दोन दिवसांत विविध विषयांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. तसेच कार्यशाळेचे आयोजनदेखील करण्यात आले होते. आंतराराष्ट्रीय दर्जाचे प्रख्यात दंतवैद्य डॉ. संदेश मयेकर यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने या दोन दिवसांच्या परिषदेची सांगता झाली.

### ‘अपरिचित रामायण’ व्याख्यान



**पनवेल** : पनवेलमधील पुरातन असे श्रीबल्लाळेश्वर व श्री रामजी देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र बापट व ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण तसेच आमचे आम्हीच यांच्या संयुक्त विद्यमाने रामनवमीच्या उत्सवात ॲड. विक्रम एडके यांचे ’अपरिचित रामायण’ या विषयावर तीन दिवसीय व्याख्यान झाले. याला पनवेलकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. १८ ते २० वर्षे वयोगटातील एक मोठा ग्रुप तीनही दिवस अगदी वेळेत या व्याख्यानासाठी येत होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील कांबरे, अनिलकुमार कुळकर्णी, किरण गोखले व आमचे आम्हीचचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

### तीन वर्षीय मुलासह विवाहिता बेपत्ता

**पनवेल** : पनवेलजवळील पळस्पे गाव येथे राहणारी एक विवाहिता आपल्या तीन वर्षीय मुलासह राहत्या घरातून निघून गेल्याने ते दोघे हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. संगीता गोरख हिप्परंकर वय २२, उंची ५ फूट २ इंच, अंगाने सडपातळ, गोरा वर्ण, निळी साडी नेसली आहे. तिला मराठी भाषा अवगत आहे. या महिलेसोबत तीन वर्षीय मुलगा प्रतीक आहे. या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाएयात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कार चोरी करणारी टोळी गजाआड

## पोलिसांकडून नऊ वाहने हस्तगत; १२ गुन्ह्यांची उकल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल, कामोठे, खारघर, रबाळे, कोपरखैरणे, परिसरातून २०२१ मध्ये मोठ्या संख्येने मारुती इको कार चोरीस गेल्या होत्या. तसेच मुंबई आयुक्तालय व ठाणे आयुक्तालय हद्दीतूनदेखील मारुती इको कार चोरीस गेल्याच्या तक्रार पोलिसांकडे आल्या होत्या. या गाड्या चोरी करणाऱ्या टोळीच्या नवी मुंबई गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या आहेत. तीन आरोपींना ताब्यात घेत पोलिसांनी तमिळनाडू राज्यातून एकूण ५४ लाखांच्या नऊ इको कार हस्तगत करून १२ गुन्हे उघडकीस आणले आहेत.



गेल्या वर्षभरात पनवेल व नवी मुंबई परिसरातून मोठ्या संख्येने इको कार चोरीला गेल्याच्या तक्रारी पोलिसांकडे करण्यात आल्या होत्या. त्यामुळे गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. त्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार, एका आरोपीचा संपर्क क्रमांक प्राप्त करून तपास सुरू केला. या गुन्ह्यात तीन आरोपी असून एक ओला कॅबचालक असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी शिताफीने आरोपी उस्मान सय्यद, शहानवाज शेख व अब्दुल सलाम शेख यांना कुर्ला व पनवेल परिसरातून अटक केली आहे. या तिघांना १४ दिवस पोलीस कस्टडीमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर आरोपी उस्मान सय्यद याचेसह पथकाने तामिळनाडू राज्यामध्ये जाऊन आरोपींनी चोरी केलेल्या एकूण नऊ मारुती इको कार हस्तगत केल्या आहेत.

आरोपींनी चोरी केलेल्या मारुती इको कार यांचे मूळ आरटीओ क्रमांक, इंजिन नंबर तसेच चेसीस नंबर नष्ट करून कारची मूळ ओळख पटवता येऊ नये याकरीता पुरावा नष्ट केल्याचे तसेच बनावट नंबर प्लेटचा वापर केल्याचे निष्पन्न झाल्याने नमूद गुन्ह्यात भादंवि. कलम १२० (ब), २०१, ४६८, ४७१, ४७२, ३४ वाढ करण्यात आली आहे.

## खासगी प्राथमिक शिक्षकांचे अधिवेशन

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा खासगी प्राथमिक शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे पहिले अधिवेशन व संघाचा वर्धापन दिन रविवारी (दि. १७) कळंबोलीमध्ये होणार आहे. या वेळी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. वर्धापन दिनानिमित्त संघटनेच्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव तसेच पुरस्कारीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव केला जाणार असल्याचे संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम यांनी सांगितले आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, स्त्री भ्रूण हत्या, पर्यावरण, व्यसनमुक्तीबाबत गीत, नृत्य व पथनाट्य सादर केली जाणार आहेत. तसेच शिक्षकांनी निर्मित केलेल्या ‘ज्ञानगंगा’ अंकाचे प्रकाशनही यावेळी करण्यात येणार असल्याचे संघटनेचे सचिव यशवंत मोकल यांनी सांगितले आहे. रायगड जिल्ह्यातील खासगी प्राथमिक शाळातील सर्व सभासदांनी वर्धापन दिनास उपस्थित राहून संघटनेचा प्रथम वर्धापन दिन यशस्वी करण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम यांनी केले आहे.

## चोरी करणारे सराईत गुन्हेगार अटकेत



साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**


चोरी करणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना नवी मुंबई मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी सुमारे ४८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २३ मोबाइल फोन असा एकूण तीन लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नवी मुंबई मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपास व सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून घरफोडी करणारे सराईत आरोपींची माहिती प्राप्त केली व मिळालेल्या माहितीचे आधारे रबाळे परिसरात सापळा रचून शफिक अब्दुल शेख यास शिताफीने ताब्यात घेतले. त्याने दिघा परिसरात घरफोडी करून सोन्याचे दागिने चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून दोन लाख ४० हजारांचे ४८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत.

तर दुसऱ्या गुन्ह्यात रबाळे परिसरात गुणाली तलाव सेक्टर १५ घणसोली येथे सापळा रचून मयूर दिपक रेंगे वय १८, रा. विटावा गाव, कोळीवाडा ठाणे आणि एक विधी संघर्षग्रस्त बालक यांना शिताफीने ताब्यात घेतले. या दोघांची अधिक चौकशी केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसी खाक्या दाखविल्यानंतर त्या दोघांनी मिळून रात्रीच्या वेळी भाग्यलक्ष्मी मोबाइल शॉपी, गावदेवीवाडी, घणसोली येथे दुकानाचे शटर तोडून एकूण २३ मोबाइल चोरल्याचे कबूल केले. तसेच चोरी केलेले २३ मोबाइल फोन पोलिसांकडे जमा केले.

याबाबत रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याने त्यांना पुढील कारवाईसाठी रबाळे पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आले आहे.





**पनवेल : ग्रुप ग्रामपंचायत कसळखंडच्या सरपंच माधुरी अनिल पाटील व भाजप बूथ कमिटी यांच्या पाठपुराव्यामुळे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक आमदार निधी अंतर्गत कसळखंड येथे (पाळटेमाळ) रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.**

**पनवेल : भाजप महिला मोर्चा शहर उपाध्यक्षा सुहासिनी केकाणे यांनी आपला वाढदिवस स्वप्नालय बालगृहात साजरा केला. या वेळी त्यांनी मुलींना शैक्षणिक साहित्य आणि सॅनिटरी पॅडचे वाटप केले. कार्यक्रमाला शहर सदस्य अंजली इनामदार, सुनीता कांबळे, महाराष्ट्र प्रदेश उपसंयोजिका अक्षया चितळे उपस्थित होत्या. या वेळी केकाणे यांनी त्यांची मुलगी डॉ. सोनिया ही मुलींसाठी शिबिर आयोजित करणार असल्याचे सांगितले.**



# बाबासाहेबांच्या स्मारकातून त्यांच्या विचारांचा प्रचार –हरी नरके

**नवी मुंबई : बातमीदार**

देशापरदेशातील २०हून अधिक स्मारकांना भेटी देण्याचा योग आला असून त्यामध्ये बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांना अभिवादन करणारे नवी मुंबई महानगरपालिकेने उभारलेले हे स्मारक पहिले आहे. स्मारकातील सुसज्ज ग्रंथालय व इतर वैशिष्ट्यपूर्ण सुविधांच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याची धडपड दिसत असल्याबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेचे कौतुक साहित्यिक, व्याख्याते हरी नरके यांनी केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ३० मार्चपासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव साजरा केला जात असून जागर २०२२ उपक्रमांतर्गत मान्यवर वक्त्यांची व्याख्याने श्रोत्यांच्या मोठ्या उपस्थितीत संपन्न होत आहेत. यामध्ये सोमवारी महात्मा फुले जयंती दिनाच्या पूर्वसंध्येला साहित्यिक व व्याख्याते हरी नरके यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नजरेतून महात्मा फुले यांची विचारक्रांती या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांना जोडणारी ४२ सूत्रे असल्याचे सांगत हरी नरके यांनी राजकीय स्वातंत्र्याआधी सामाजिक सुधारणेला महत्त्व देणारी महात्मा फुले यांची विचारधारा हा त्यांच्यामधील महत्त्वाचा धागा असल्याचे सांगितले. बाबासाहेबांनी केलेले कार्य हे देशातील सर्व समाज घटकांच्या भल्याचे असल्याचे स्पष्ट करीत हरी नरके यांनी बाबासाहेबांना एका समाजाच्या चौकटीत बंदिस्त करू नका, ते ’आमचे बाबासाहेब नाहीत’ तर ’आपले बाबासाहेब आहेत’ अशा शब्दात बाबासाहेबांच्या सर्वात्मकतेचा विशेष उल्लेख केला.

कोणतीही वैचारिक चळवळ उभी करण्यासाठी एक आदर्श नजरेसमोर असावा लागतो, तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने महात्मा फुले यांनी नजरेसमोर ठेवला. रायगडावर जाऊन शिवरायांची समाधी शोधून काढली. शिवजयंती उत्सव सुरू केला. १ जून १८६९ साली पहिले शिवचरित्र लिहिले, ज्याची नोंद पुस्तक अभिरक्षक कार्यालयात आहे, अशी विस्तृत माहिती त्यांनी सोदाहरण सांगितली.

## नवी मुंबईत रस्त्याच्या दुतर्फा पार्किंग

### शहरातील वाहतुकीस अडथळा; नागरिकांमध्ये नाराजी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात वाहने उभी करण्यासाठी स्वतंत्र जागा नसल्याने रस्त्यांच्या दुतर्फा वाहने उभी केली जात असून ती वाहतुकीस अडथळा ठरत आहे. याबाबत पोलिसांकडून कारवाई केले जाते, मात्र त्यानंतर परिस्थिती जैसे थे होत नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

वाशी ते कोपरी गाव पामबीच मार्गावर अवैध पार्किंगचा प्रश्न बिकट झाला आहे. रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी केली जात आहेत. बेलापूर ते दिघा प्रत्येक विभागात पार्किंगचा बोजवारा उडाला आहे. पार्किंग जागांपेक्षा वाहने उदंड असे चित्र शहरात सर्वत्र आहे. वाहतूक विभागामार्फत बेकायदा पार्किंगवर कारवाई केली जाते, परंतु त्यांनाही मर्यादा येत असल्याचे चित्र आहे. सिडकोकडून पालिकेला पार्किंगसाठी मिळणारे भूखंड अद्याप मिळालेले नाहीत. त्यामुळे शहरात पार्किंगबाबत ठोस उपाययोजना होत नाहीत, असे पालिकेचे म्हणणे आहे. यामुळे शहरातील वाहतुकीवरही परिणाम होत आहे.

नवी मुंबई शहर नियोजनबद्ध शहर असले तरी पार्किंगच्या नियोजनाबाबत उदासिनता आहे. पालिकेने पार्किंग प्लाझा तयार करावेत व सिडकोकडून पार्किंगसाठीचे भूखंड मिळवावेत एवढीच अपेक्षा सामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत.



## एनएमएमटी खरेदी करणार डबल डेकर बस

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पालिकेने कमी इंधनात जास्त प्रवासी वाहतूक करता यावी आणि कार्बन वापर कमी व्हावा यासाठी एनएमएमटीसाठी दहा डबल डेकर बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सप्टेंबरपर्यंत पहिली डबल डेकर नवी मुंबईत येणार आहे. या दहापैकी एक बस ही पर्यटकांसाठी असून नवी मुंबई दर्शन घडविण्यात येणार आहे.

जास्तीत जास्त प्रवासी वर्दळ असलेल्या ठिकाणी डबल डेकर बस सुरू केल्यास कमी इंधनात जास्त प्रवासी वाहतूक करता येणार आहे. त्यासाठी दहा डबल डेकर बसेस येत्या काळात खरेदी केल्या जाणार असून त्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. प्रायोगिक तत्त्वावर पहिली बस पावसाळ्यानंतर दाखल होणार असून या बससाठी चार वर्दळीचे मार्ग निश्चित करण्यात आलेले आहेत. नवी मुंबईच्या पामबीच मार्गावरून धावणारी डबल डेकर ही या शहराचे आकर्षण ठरणार आहे.

## जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यपद्धतीबाबत प्रशिक्षण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताहाच्या अनुषंगाने बुधवारी (दि. १३) दुपारी २ वाजता जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यपद्धतीबाबत ऑनलाइन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ६ ते १६ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम राबविण्याचे निर्देश सामाजिक न्याय विभागाने दिले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यभरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत इयत्ता ११ वी आणि १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी, पालक व संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य व संबंधित कर्मचाऱ्यांकरीता जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यपद्धतीबाबत ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पुढील लिंकचा वापर करावा. https://us05web.zoom.us/j/82194285501?pwd=aU96bDNrcm1IK0srMzZ5N2hINXR0Zz09, मिटिंग आयडी–८२१९४२८५५०१, पासवर्ड– 15GT9f असा आहे. इयत्ता ११ वी आणि १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी, पालक व संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य व संबंधित कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने या ऑनलाइन कार्यशाळेस उपस्थित राहून जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यपद्धती समजून घ्यावी, असे आवाहन केले आहे.

## तापमानवाढीमुळे भाजीपाला खराब होण्याच्या प्रमाणात वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मार्च महिन्यापासून अचानक वाढलेल्या तापमानाचा भाजीपाला उत्पादनावर परिणाम झाला असून तीव्र उन्हामुळे माल खराब होत आहे. त्यामुळे एपीएमसीतील भाजी बाजारात आवक कमी होत असून मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी आहे. परिणामी भाजीपाल्याच्या दरात २० ते २५ टक्के वाढ झाली आहे.



एपीएमसी बाजारात टोमॅटो, भेंडी, कारली, फरसबी, पापडी, वांगी आणि पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. हिवाळ्यात भाज्यांचे उत्पादन अधिक असल्याने ५५० ते ६०० गाड्या आवक होत असते. मात्र उन्हाळा सुरू होताच भाज्यांची आवक घटत असते. सध्या बाजारात १५० ते २०० गाड्या आवक कमी होत आहे. त्यात उन्हामुळे भाजीपाला खराब होण्याचे प्रमाणही अधिक असल्याचे घाऊक व्यापाऱ्यांनी सांगितले.

**भाजीपाल्याचे दरही वाढले**

घाऊक बाजारात भेंडी आधी २४ ते २५ रूपयांवरून आता ३० रूपये तर पापडी ७० ते ७५ रूपयांवरून ९० रूपये, टोमॅटो १४ ते १५ रूपयांवरून १८ ते २० रूपये, फरसबी ७० ते ७५ रूपयांवरून ८० ते ९० रूपये, कारली २० ते २२ रूपयांवरून ३२ रूपये, वांगी २६ ते २८ रूपयांवरून ३४ ते ३५ रूपयांपर्यंत दरवाढ झाली आहे. त्यामुळे गृहिणींचे बजेट पुरते कोलमडले आहे.

## मोडी लिपी हस्ताक्षर आणि लिप्यंतर स्पर्धा

**नवी मुंबई :** जागतिक मोडी लिपी प्रसार समिती आणि स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील पाच शहरांमध्ये सुंदर मोडी हस्ताक्षर स्पर्धा आणि शीघ्र मोडी लिप्यंतर स्पर्धा अशा दोन स्पर्धांचे आयोजन येत्या १ मे महाराष्ट्र दिनी करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी २९ एप्रिलपर्यंत नोंदणी करणे गरजेचे आहे.

मुंबई, पुणे, अहमदनगर, नाशिक आणि कोल्हापूर या ठिकाणी या दोन्ही स्पर्धा एकाच दिवशी घेण्यात येतील. या दोन्ही स्पर्धांमधील पहिल्या तीन विजेत्यांना पारितोषिके दिली जातील तसेच स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्रही देण्यात येईल. ही स्पर्धा मुंबईत स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, शिवाजी पार्क, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर येथे होईल. त्यासाठी दूरध्वनी ०२२–२४४६५८७७ येथे संपर्क साधावा. तसेच पुणे येथे मोबाइल क्रमांक ९८८११०४३७९, अहमदनगर–ऐतिहासिक संग्रहालय (मो. क्र. ९३७२१५५४५५) आणि कोल्हापूर (मो. क्र. ९३७१४६०६६१) तर नाशिक येथे (मो. क्र. ९८५०७४६१७२) येथे संपर्क साधावा. स्पर्धेच्या वेळी पुस्तक विक्रेत्यांनीही मोडी विषयक पुस्तकांचे स्टॉल ठेवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मुंबई-पुणे महामार्ग दुरुस्तीला प्रारंभ

## पावसाळ्यात होणारे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळ्यात धोकादायक बनणारा जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दुरुस्तीचे उपचार सुरू झाले असून, अपघात प्रवणक्षेत्रात मिलिंग यंत्राचा वापर करून रस्ता सुरक्षित करण्याचे काम आयआरबीने हाती घेतले आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर खालापूर ते दांडफाटा या चौदा किलोमीटर पट्ट्यात पावसाळ्यात सातत्याने अपघात घडत आहेत. या महामार्गावर २०१८ मध्ये करण्यात आलेल्या डांबरीकरणामुळे खालापूर हद्दीतील रस्त्याचा पृष्ठभाग काही ठिकाणी अतिशय गुळगुळीत आणि निसरडा झाला होता. दांड फाटा ते खालापूर या दरम्यान पावसाळ्यात अपघाताचे प्रमाण प्रचंड वाढत असून ठराविक ठिकाणीच सातत्याने अपघात होत असल्याने अपघाताच्या हॉटस्पॉट बनलेल्या ठिकाणी दुरुस्तीची गरज होती. डांबरीकरणाच्या वेळी झालेल्या तांत्रिक चुकीमुळे पावसाळ्यात वाहने अनियंत्रित होऊन पलटी होण्याचे प्रमाण वाढले होते. २०१९ मध्ये मिलिंग मशिनच्या सहाय्याने महामार्ग काही ठिकाणी खडबडीत करण्यात आला होता. मात्र हे काम पूर्ण न झाल्यामुळे लोधीवली, वावंढळ, विणेगाव तसेच खालापूर हद्दीत पावसाळ्यात अपघात घडले होते. रस्ता सुरक्षा उपाययोजनांसाठी काम करणाऱ्या दिलासा फाउंडेशनकडून याठिकाणी दुरुस्तीसाठी आयआरबी अभियंत्यांकडे पाठपुरावा सुरु होता.

अपघात घडणाऱ्या ठिकाणी मिलिंग यंत्र वापरून रस्त्याचे काम करण्यात येईल, असा शब्द आयआरबी अभियंता अभय पावसकर यांनी दिला होता. त्याप्रमाणे कामाला सुरुवात झाली आहे.

**मुंबई-पुणे महामार्गावर खालापूरपासून मिलिंग यंत्राने काम सुरू झाले आहे. पावसाळा संपताच शेडुंग ते खालापूर महामार्गावर डांबरीकरणाचा थर करण्यात येणार आहे.**

**-अभय पावसकर, अभियंता, आयआरबी**

**मुंबई-पुणे महामार्गावरून मी नेहमी प्रवास करतो. गेल्यावर्षी पावसाळ्यात खालापूर खडीमशीनजवळ वेग जास्त नसतानादेखील ब्रेक लावण्याचा प्रयत्न केला असता ब्रेक लागला नाही आणि गाडी पलटी झाली. त्यानंतर त्याठिकाणी सातत्याने अपघात घडत होते.**

**-गजानन गुणाजी शिंदे, प्रवासी, खालापूर**



(छाया : विनायक माडपे)

# रोज 'मरे' त्याला कोण रडे...




**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई आणि पुणे या दोन मोठ्या शहरांच्या मध्यवर्ती असलेले शहर म्हणजे खोपोली. या शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या शहरातून थेट मुंबईला जाण्यासाठी रेल्वेची लोकल सेवा आहे. त्यामुळे मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र त्यामानाने लोकल ट्रेनची संख्या अपुरी आहे. एक लोकल सुटली की, एक तासाने दुसरी लोकल आहे.

खोपोली-कर्जत हा प्रवास वीस मिनिटांचा मात्र काही दिवसापासून या प्रवासाला अर्ध्या तासाहून अधिक वेळ लागत असल्याने, हा प्रवास दिवसेंदिवस कंटाळवाणा होत आहे. त्यामुळे मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांना, विद्यार्थ्यांना पुढील कनेक्टेड गाडी मिळत नाही. प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रेल्वे प्रशासनाने तात्काळ दखल घेतली नाही तर प्रवाशांचा उद्रेक होऊ शकतो, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

खोपोलीवरून सुटणाऱ्या अनेक लोकल गाड्या सध्या विलंबाने सुटत असल्याच्या प्रवाशांच्या तक्रारी आहेत. अनेकदा गाडी केळवली व पळसदरी या दोन स्थानकादरम्यान कधी कधी काही कारण नसताना बराच वेळ थांबवली जाते तर पुढे पळसदरी ते कर्जत या दरम्यानही अनेकदा लोकल थांबविली जाते. पुढील कर्जतपर्यंतचा प्रवास रखडत रखडत करावा लागतो. परिणामी मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांच्या कर्जत-मुंबई या कनेक्टेड गाड्या डोळ्यासमोरून सुटतात. त्यामुळे अनेक प्रवाशांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

रेल्वे प्रशासनाने याबाबत तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी खोपोली-मुंबई प्रवास करणारे प्रवासी करीत आहेत. जर तात्काळ याबाबत सुधारणा झाली नाही तर कधीही प्रवाशांचा उद्रेक होऊ शकतो, अशी सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे.

# आंबिवलीतील माजी सरपंचांच्या स्थावर मालमत्ता लिलाव आणि दंडवसुलीवर निकालापर्यंत स्थगिती

## अवैध रेती उत्खननप्रकरणी तहसीलदारांच्या कारवाईला चाप

पोलादपूर : प्रतिनिधी

रेती उत्खननप्रकरणी झालेल्या कारवाईवर स्थगिती आणि अंतिम निर्णयापर्यंत दंडवसुली न करण्याच्या न्यायालयाच्या आदेशामुळे महाड तहसीलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कारवाईला चाप बसविण्यात वादी रमेश खिडबिडे आणि त्यांचे वकील ॲड. राजेश जोशी यशस्वी झाले आहेत.

महाड तहसीलदार यांच्या कार्यक्षेत्रातील आंबिवली येथील नागेश्वरी नदीपात्रातील सुमारे ५०.४१ ब्रास वाळूचे १७ ढिग तत्कालीन सरपंच व वादी रमेश खिडबिडे व संदीप रमेश खिडबिडे यांनी विनापरवाना, बेकायदेशीरपणे, शासनास रॉयल्टीची रक्कम न भरता त्यांच्या माणसांच्या मदतीने जंगलात नष्ट केल्याच्या तक्रारींच्या आधारे खिडबिडे यांना महाड तहसील कार्यालयाने २३ मार्च २०१८ रोजी नोटीशीद्वारे १० लाख ९० हजार ११६ रूपये दंड आकारला होता. सदर दंडाची रक्कम अदा न केल्याने खिडबिडे यांच्या मालमत्तेवर दंडाचा बोजा चढविण्यात आला. यानंतर २० एप्रिल २०२१ रोजी खिडबिडे यांच्या मालमत्तेचा जाहीर लिलाव आयोजित केल्याची नोटीस स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्यात आली होती.

या कारवाईचा फोलपणा उघडकीस आणून ॲड. जोशी यांनी महाड येथील न्यायालयामध्ये वादी रमेश खिडबिडे यांच्यातर्फे खटला दाखल केला. खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कारवाईवर स्थगिती आणि दंडवसुली न करण्याचे आदेश न्या. आर. आर. पाटील यांनी ७ एप्रिल २०२२ रोजी दिले.

# कोकण रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

> माणगाव तालुक्यातील इंदापूर येथील घटना

तालुक्यातील इंदापूर रेल्वे स्टेशनच्या हद्दीत चमनकुमार काल्लुराम भट (वय ६५, रा. तळाशेत, ता. माणगाव) यांना कोकण रेल्वेची धडक गंभीर दुखापती झाल्या त्यात त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे. अधिक तपास महिला उपनिरीक्षक पाटील करीत आहेत.

# महसूल कर्मचाऱ्यांचा संप नवव्या दिवशीही सुरूच

## कामकाज ठप्प, नागरिकांची गैरसोय

**कर्जत : प्रतिनिधी**

दोन वर्षांपासून पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याने रायगड जिल्ह्यातील महसूल कर्मचारी ४ एप्रिलपासून बेमुदत संपावर गेले आहेत. संपाचा आजचा नववा दिवस आहे. यामुळे जिल्ह्यातील, तालुक्यातील महसूल विभागातील कामकाज ठप्प झाले आहे.

आपल्या प्रलंबित मागण्यांची तड लावण्यासाठी महसूल कर्मचारी संघटनांनी २१ मार्च २०२२पासून निदर्शने, काळ्या फिती लावून काम करणे, एक दिवसाचा लाक्षणिक संप अशी आंदोलने केली आहेत. तरीही राज्य सरकार त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे ४ एप्रिलपासून महसूल कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत.

राज्य महसूल कर्मचारी संघटना पदाधिकाऱ्यांची ७ एप्रिल रोजी राज्य शासनासोबत मुंबई येथे बैठक झाली. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार शासन मागण्यांसाठी ठोस निर्णय घेण्याचा मनस्थितीत नाही, असे दिसून आले होते. त्यामुळे आमच्या मागण्यांबाबत जोपर्यंत शासन निर्णय घेत नाही, तोपर्यंत आमचे हे आंदोलन, संप सुरूच राहणार आहे असे पदाधिकाऱ्यांनी सांगितले होते.

आज (दि.१२) संपाचा नववा दिवस आहे, कर्मचारी संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष केतन भगत, सरचिटणीस भूषण पाटील, कार्याध्यक्ष गोवर्धन माने यांनी कर्जत तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांची तसेच कर्जत उपविभाग अध्यक्ष संदीप गाढवे, तालुका अध्यक्ष रवी भारती यांची भेट घेतली व त्यांच्याशी चर्चा केली.



(छाया : विजय मांडे)

**शासन जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य करीत नाही तोपर्यंत बेमुदत संप सुरूच राहणार.**

**-केतन भगत, जिल्हाध्यक्ष, महसूल कर्मचारी संघटना**

# कर्जतमध्ये मधमाशांच्या हल्ल्यात वृद्ध जखमी

**कर्जत : बातमीदार**

येथील पोलीस ठाण्याबाहेर मधमाशांचा पोळा आहे, त्याला धक्का लागताच मधमाशांनी परिसरातील नागरिकांवर हल्ला केला. तेथे असलेल्या एका वृद्धाला मधमाशांनी घेरले, त्यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी जयवंत काठे यांनी चतुराई दाखवून मधमाशांच्या तावडीतून वृद्धाला वाचवले.

कर्जत पोलीस ठाण्याबाहेर असलेल्या मधमाशांच्या पोळ्याला धक्का लागताच मधमाशांनी रस्त्यातून जाणाऱ्या वृद्धावर हल्ला केला. त्यावेळी सदर वृद्धाने मदतीसाठी आरडाओरड केली. ते पाहून कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी जयवंत काठे यांनी आपल्या दुचाकीच्या डिकीत असलेल्या कपड्याचा काही भाग हातात घेतला आणि सॅनिटायझरच्या मदतीने पेटवला. त्यानंतर मधमाशा पळून गेल्या आणि त्यांच्या जाचातून वृद्धाची सुटका झाली. या हल्ल्यात जखमी झालेल्या वृध्दाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या बचावकार्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून पोलीस कर्मचारी काठे यांचे कौतुक होत आहे.

# नेरळजवळ रेल्वेमार्गावर विद्यार्थिनीचा मृतदेह

**कर्जत : बातमीदार**

परीक्षेचा पेपर देण्यासाठी सोमवारी दादर येथील महाविद्यालयात निघालेल्या ठाकूर्ली डोंबिवली भागातील विद्यार्थिनीचा मृतदेह मंगळवारी (दि. १२) भिवपुरी रोड ते नेरळ या स्थानकांदरम्यान रेल्वेमार्गावर आढळला.


डोंबिवली भागात राहणारी मंगला संतोष शिरोडकर ही तरुणी मुंबईतील कीर्ती कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेत होती. सोमवारी तिचा वाढदिवस होता. नेहमीप्रमाणे सकाळी साडेनऊ वाजता ट्रेन पकडून कॉलेजला पेपर देण्यासाठी गेलेली मंगला सायंकाळी घरी परत आली नाही. त्यामुळे पालकांनी जवळच्या पोलीस ठाण्यात कळविले होते. मंगळवारी सकाळी ८ वाजता कर्जत येथून मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आंबिवली पॉवर स्टेशनच्या पुढे रेल्वे मार्गावर मृतदेह पडल्याचे दिसले. त्याची खबर नेरळ स्थानकातील पोलिसांना देण्यात आली. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी मंगलाला मृत घोषित केले.

दरम्यान, ठाकुर्ली-दादर असा रेल्वे पास बाळगणारी आणि त्या मार्गावर प्रवास करणारी मंगला हिच्या पर्समध्ये सीएसएमटी ते खोपोली असे तिकीट होते. त्यामुळे पालकदेखील चक्रावून गेले असून ती तरुणी खोपोली मार्गावर कधी आणि कशी गेली तसेच तिला भिवपुरी रोड-नेरळदरम्यान अपघात कसा घडला असे अनेक प्रश्न या निमित्ताने पुढे आले आहेत.

# महाडमध्ये पंचगव्य चिकित्सा संमेलन

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पंचगव्य डॉक्टर्स असोसिएशन यांनी आयोजित केलेले आठवे पंचगव्य चिकित्सा संमेलन महाड येथील वीरेश्वर मंदिरामध्ये ८ व १० एप्रिलला उत्साहात पार पडले. राजापूर सोलगाव येथील पंडित पंचगव्य गुरुकुल विस्तार केंद्र व संमेलन समितीने या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले होते.



(छाया : महेश शिंदे)

पंडित पंचगव्य गुरुकुलचे सुहास पंडित, सई पंडित, संदीप सुतार, प्रमोद केळकर, पंचगव्य डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष मधुकर फडोल, उपाध्यक्ष जमानंद कांबळे, सचिव योगेश आंब्रे यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले दीडशेहून अधिक पंचगव्य चिकित्सक या संमेलनाला उपस्थित होते. शनिवारी सकाळी विरेश्वर मंदिरापासून महाड बाजार पेठ मार्गे गो पदयात्रा काढण्यात आली होती. पंचगव्य विद्यापीठम कांचीपुरमचे कुलपती निरंजन वर्मा,उपकुलपती कमल टावरी यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा काढण्यात आली होती. या पदयात्रेत गाईचे महत्त्व, गो चिकित्सा व गाय वाचवण्याचा संदेश देण्यात आला.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये निरंजन वर्मा यांचे गो चिकित्सेवरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला महाडमधील स्वतः ची गोशाळा असलेले उद्योजक अमृत पटेल व विश्राम पटेल उपस्थित होते. महाडकरांचा या व्याख्यानाला चांगला प्रतिसाद मिळाला. या व्याख्यानात निरंजन वर्मा यांनी व्हायरसची उत्पत्ती, त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम व पंचगव्य औषधीमुळे वाढणारी रोगप्रतिकारक शक्ती, शिवपुराणातील वायरसचा उल्लेख यावर विवेचन केले. या वेळी रायगड जिल्ह्यातील गो संगोपन व संवर्धन, गोरक्षा, गो आधारित शेती, प्रचार व प्रसार या क्षेत्रामध्ये काम करत असलेल्या व्यक्तींचा निरंजन वर्मा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

रविवारी (दि. १०) पंचगव्य चिकित्सेआधारे कोरोनावर मात करणाऱ्या व्यक्तींनी मनोगत व्यक्त केले. पंचगव्य चिकित्सा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या गव्यसिद्धांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर उत्कृष्ट गो-सेवक, चिकित्सक, प्रचारक यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. पंचगव्य डॉक्टर असोसिएशनशी संलग्न जिल्हानिहाय समित्यांच्या नियुक्त्या झाल्या.

# अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांची मुरुड नगर परिषदेस सदिच्छा भेट

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी मंगळवारी (दि. १२) मुरुड नगर परिषदेस सदिच्छा भेट दिली. मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. या वेळी मुरूडचे पोलीस निरीक्षक नितीन गवारे उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी नगर परिषद कारभाराची माहिती घेतली सुरु असलेल्या कामांबाबत समाधान व्यक्त केले. मुख्याधिकारी भुसे यांनीही नगर परिषदेच्या कामकाजाविषयी चांगली माहिती विषद केली. नगर परिषदेचे सर्व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.



# मुरूडमध्ये कॅम्पस मुलाखती; ५२ विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग





(छाया : संजय करडे)

**मुरुड : प्रतिनिधी**

वसंतराव नाईक महाविद्यालय व आयसीआयसीआय बँक यांच्या संयुक्त विद्यमाने बॅंक नोकरीसाठी चाचणी पेपर, ट्रेनिंग व मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मुरुडमधील वसंतराव नाईक महाविद्यालयातील ४२ तर जिल्हातील नऊ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. चालून आलेल्या संधीतून आपले कौशल्य सादर करुन आपले करिअर घडवा, असे आवाहन प्राचार्य डॉ. मेहबुब नगरबावडी यांनी या वेळी विद्यार्थ्यांना केले.

बॅंकींग व विमा क्षेत्रातील रोजगारांच्या विविध संधी आमच्या बँकेमार्फत मिळणार आहेत. त्याचा परिपुर्ण लाभ घ्यावा असे आवाहन आयसीआयसीआय बँकेचे विभागीय अधिकारी निरंजन मोहिते यांनी या वेळी केले. वसंतराव नाईक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, डॉ. मुरलीधर गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले.

***कॅम्पसमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे ऑफलाईन चाचणी पेपर घेतले जातील. बौद्धिक चाचणी, मुलाखती व क्षमता चाचणी त्यानंतर त्यांची नोकरीसाठी निवड करण्यात येईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ४५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.***

# चौलमध्ये एकपात्री अभिनय स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल भाटगल्लीमधील मोरया कला अकादमीच्या वतीने १ मे रोजी एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन केले आहे.

सर्वांसाठी खुली असलेली ही स्पर्धा दोन गटात घेतली जाणार आहे. प्रथम गट सहा ते १४ वर्ष वयोगटाचा असेल, तर व्दितीय गट १५ वर्षावरील सर्वांसाठी असेल. प्रथम गटासाठी तीन ते सहा मिनिटे व व्दितीय गटासाठी पाच ते सात मिनिटे वेळ देण्यात येईल. स्पर्धेतील तीन विजेत्यांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

प्रसिध्द नाट्य कलाकार प्रकाश कवळे यांच्या संकल्पनेतून घेण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रकाश कवळे (९९६९००९७२१) किंवा सुधाकर मेस्त्री (९७०२५४५०१२) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-4/22-23 (RFX No. 7000022975) | Period for submission of E-Bid: 12.04.2022 to 19.04.2022 up to 23:59hrs |
|---|---|

**Name of Work: AMC of restoration and maintenance of the SECURITRON make Fire Detection and Alarm system provided at 400kV R.S., Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| Limited to Rs.10,00,000/- (Including GST) | Rs. 10,000/- | Rs.500/- + GST | **19.04.2022** up to 23:59 hrs | **20.04.2022** at 10:00 hrs (If possible) | **20.04.2022** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

SD/-
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | मुंबई वि. पंजाब सायं. ७.३० वा., पुणे

# गुजरातचा विजयरथ हैदराबादने रोखला



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएलमध्ये आतापर्यंत सलग तीन सामने जिंकलेल्या गुजरातचा विजयरथ हैदराबादने रोखत त्यांचा आठ गडी राखून पराभव केला. गुजरातने दिलेले १६२ धावांचे लक्ष्य हैदराबादने आठ गडी आणि पाच चेंडू राखून गाठले.

गुजरातने दिलेले १६३ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी हैदराबादचे अभिषेक मिलर आणि केन विल्यम्सन या जोडीने सुरुवातीपासून चांगली खेळी केली. विल्यम्सनने अर्धशतकी खेळ करीत ४६ चेंडूंमध्ये ५७ धावा केल्या, तर अभिषेक शर्माने ३२ चेंडूंमध्ये सहा चौकरच्या मदतीने ४२ धावा केल्या. त्यानंतर दोघेही झेलबाद झाल्यानंतर राहुल त्रिपाठीने मोठे फटके मारत हैदराबादचा धावफलक धावता ठेवण्याचा प्रयत्न केला, मात्र खेळताना दुखापत झाल्यामुळे त्रिपाठीला रिटायर्ड हर्ट म्हणून तंबूत परतावे लागले. त्यानंतर मैदानात आलेल्या निकोलस पूरन आणि ऐडन मर्कराम या जोडीने संघाला विजयापर्यंत नेले. शेवटच्या सात चेंडूंमध्ये पाच धावांची गरज असताना पूरनने चौकार लगावत विजय पक्का केला तसेच शेवटच्या षटकातील पहिल्याच चेंडूवर पूरनने षटकार लगावल्यामुळे शेवटी आठ गडी राखून हैदरबादने दणदणीत विजय संपादन केला.

यापूर्वी नाणेफेक जिंकून सनरायझर्स हैदराबादने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. गुजरात टायटन्सकडून सलामीला आलेले डेविड वेड आणि शुभमन गिल मैदानावर तग धरू शकले नाही. वेडने १९, तर गिलने सात धावा केल्या. साई सुदर्शन ११ धावा करून परतला. कर्णधार हार्दिक पांड्याने जबाबदारीने फलंदाजी करीत अर्धशतक झळकावले. त्याने ४२ चेंडूंमध्ये चार चौकार आणि एक षटकार लगावत ५० धावा केल्या.

यानंतर अभिनव मनोहर वगळता गुजरातचा एकही फलंदाज चांगल्या धावा करू शकला नाही. डेव्हिड मिलर १२ धावांवरबाद झाला, तर तीन वेळा जीवदान मिळालेल्या मनोहरने ३५ धावा करीत गुजरातला १६२ धावांपर्यंत घेऊन जाण्यास मदत केली. सहा धावा करून राहुल तेवतीया नाबाद राहिला, तर राशिद खान खाते न खोलता तंबूत परतला.

# रायगडच्या अजय पाटीलने रचला विश्वविक्रम

## अवघ्या एका तासात १७०० सूर्यनमस्कार

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केले कौतुक



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील बळवली गावच्या अजय कमलाकर पाटील याने अवघ्या एका तासात सलग १७०० भारतीय सूर्यनमस्कारचा विश्वविक्रम केला आहे. अजयच्या या कर्तृत्वाने रायगडसह देशाचे नाव उंचावले आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी काढले.

अजयच्या नावे यापूर्वी ५५५५ सूर्यनमस्कारांचा विक्रम होता. आता आयइए बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसाठी त्याने अंधेरी येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये एका तासात न थांबता तब्बल १७०० सूर्यनमस्कार काढून आपल्या नावे विश्वविक्रम नोंदविला आहे. या वेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, योगगुरू स्वामी स्वीवंदा, पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावसकर, योगीराज डॉ. मंगेश, योगगुरू डॉ. अशोक भोईर, राजेश अंगत, मिलिंद बोचरे, विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष भूपद्रव महाराज, सुभाष टेंबे, नंदेश पाटील, विप्रव म्हात्रे, पत्रकार धम्मशील सावंत, आदित्य पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

अंधेरी येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये अजयचा हा रेकॉर्ड होत असताना बळवली ग्रामस्थांनी मोठ्या पडद्यावर थेट प्रक्षेपण पाहत एकच जल्लोष व आनंदोत्सव साजरा केला. या यशानंतर अजयचे रायगडच्या मायभूमीत जंगी स्वागत करण्यात आले. त्याच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेत द. आफ्रिकेचे वर्चस्व



**ग्वेबेर्हा : वृत्तसंस्था**

डावखुरा फिरकीपटू केशव महाराज (७/४०) आणि लेग-स्पिनर सायमन हार्मर (३/३४) या फिरकी जोडीच्या प्रभावी माऱ्यामुळे दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या कसोटी सामन्यात बांगलादेशचा ३३२ धावांनी धुव्वा उडवला. या विजयासह आफ्रिकेने मालिकेत २-० असे निर्भेळ यश मिळविले.

दुसऱ्या कसोटीत आफ्रिकेने विजयासाठी बांगलादेशला ४१३ धावांचे लक्ष्य दिले. याचा पाठलाग करताना तिसऱ्या दिवसअखेर बांगलादेशची ३ बाद २७ अशी स्थिती होती. चौथ्या दिवशी १४ षटकांमध्येच बांगलादेशचे उर्वरित सात गडी बाद झाले आणि त्यांचा दुसरा डाव केवळ ८० धावांत आटोपला. त्यांच्या एकाही फलंदाजाला ३० धावांचा टप्पा पार करता आला नाही.

तत्पूर्वी, द. आफ्रिकेच्या ४५३ धावांच्या प्रत्युत्तरात बांगलादेशचा पहिला डाव २१७ धावांत संपुष्टात आला होता. त्यानंतर आफ्रिकेने दुसरा डाव ६ बाद १७६ धावांवर घोषित केला होता.

या सामन्यात एकूण नऊ बळी आणि पहिल्या डावात ८४ धावांची खेळी करणाऱ्या महाराजला सामनावीर आणि मालिकावीराचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्याने दोन सामन्यांत मिळून १६ बळी घेतले.

# आयपीएलमधून दीपक चहर आऊट?

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या पंधराव्या हंगामात गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्जची या हंगामात पुरती दुर्दशा झाली आहे. चेन्नईने आतापर्यंत सर्व चार सामने गमावले आहेत. अशातच चेन्नईला मोठा धक्का बसला आहे. चेन्नईचा दिग्गज वेगवान गोलंदाज दीपक चहर आयपीएलमधून बाहेर पडण्याची शक्यता आहे. पाठीचे दुखणे उद्भभवल्यामुळे तो या आयपीएलमध्ये खेळण्याची शक्यता कमी असल्याचे म्हटले जात आहे.

दीपक चहर मागील अनेक दिवसांपासून बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत उपचार घेत आहे. त्याला पुन्हा पाठीचा त्रास होत आहे.

# रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या खेळाडूंचे घवघवीत यश





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा अॅथेलेटीक्स चॅम्पियनशीप २०२२-२३ रसायनी येथील एचओसीएल इंटरनॅशनल स्कूल या ठिकाणी ९ व १० एप्रिल रोजी झाली. या स्पर्धेत उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या खेळाडूंनी घवघवीत यश प्राप्त केले आहे.

या जिल्हास्तरीय स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा खेळाडू आदित्य अनंत पालांडे याने धावण्याच्या १०० मीटर शर्यतीत ११ मिनिटे १२ सेकंद नोंद देऊन आणि २०० मीटर शर्यतीत २३ मिनिटे १ सेकंद वेळ नोंदवून प्रथम क्रमांक पटकाविला.

याशिवाय मनीष रवींद्र देशमुख याने धावण्याच्या १०० मीटर शर्यतीत ११ मिनिटे ४६ सेकंद वेळ देऊन तृतीय क्रमांक मिळविला, तर ट्रिपल जंपमध्ये १२.५७ मीटर जंप मारून प्रथम क्रमांक प्राप्त केला.

या कामगिरीबद्दल दोन्ही खेळाडूंची २१ ते २३ एप्रिलदरम्यान पिंपरी चिंचवड येथील संत ज्ञानेश्वर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सकडून त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# रायगड जिल्हा बुद्धिबळ निवड स्पर्धेला प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने आणि पनवेल चेस असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्ह्यातील १० व १४ वर्षांखालील बुद्धिबळ संघाची निवड करण्यासाठी नुकतीच स्पर्धा घेण्यात आली. खारघर येथील संजीवनी इंटरनॅशनल स्कूलमध्ये झालेल्या या स्पर्धेस प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे, सदस्य नंदकुमार पालवे यांच्या हस्ते झाले. या वेळी पनवेल चेस असोसिएशनचे सचिव सी. एन. पाटील, सदस्य विकास घाटूगडे, संजीवनी स्कूलचे शिक्षल योगेश उपस्थित होते, तर बक्षीस वितरण समारंभ स्वप्नील ठीक, अॅड. गोपीनाथ डंगर आदींच्या उपस्थितीत झाला. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून अमित कदम, श्रेयस पाटील विकास घाटूगडे, सुशील गुरव यांनी काम पहिले.

राज्यस्तरीय स्पर्धा १० वर्ष वयोगटाची १४ व १५ एप्रिल रोजी कोल्हापूर येथे, तर १४ वर्ष वयोगटाची २९ एप्रिल ते १ मेदरम्यान सोलापूर येथे होणार आहे. यात जिल्हा स्पर्धेत प्रथम आलेले दोन स्पर्धक भाग घेतील. त्यांना रायगड व पनवेल चेस असोसिएशनतर्फे चंद्रशेखर पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र, प्रथम दोघांना चषक व इतर विजेत्यांना पदक देण्यात आले.

**गटनिहाय विजेते**

१० वर्षाखालील मुले : अभिलाष यादव प्रथम, आरव राज द्वितीय, माहित चिरायील तृतीय, आर. मिथुन चतुर्थ आणि वैभव सिंग, कौस्तुभ भगत, कविष कागवडे, शिवम श्रीवास्तव, शौर्या सिन्हा उत्तेजनार्थ; १४ वर्षाखालील मुले : पारस भोईर प्रथम, आरव अय्यर द्वितीय, शंतनु पेंडसे तृतीय, अथर्व मेहत्रस चतुर्थ आणि ई. अभिषेक, श्र्याव्य गावंड, पार्थ बीडवे, आरीव प्रभाकर, आरव खेदू उत्तेजनार्थ; १० वर्षाखालील मुली :जस्विता चित्तूरी प्रथम, अनुष्का नेरकर द्वितीय, ईशिता महातपूरकर तृतीय, दिव्यांशी वनवारी चतुर्थ; १४ वर्षाखालील मुली : पल्लवी यादव प्रथम, ज्ञानदा गुजराथी द्वितीय, ईनी शेट्टी तृतीय, स्पृहा सोनावणे चतुर्थ.

# पनवेल येथे शुक्रवारी खो-खो पंच परीक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनतर्फे येत्या शुक्रवारी (दि. १५) पनवेल येथे जिल्हास्तरीय खो-खो पंच परीक्षा घेण्यात येणार आहे.

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल तालुका क्रीडा संकुलात ही परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी महिती रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे कार्यवाह आशिष पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील सर्व शाळांमधील क्रीडा शिक्षक, मार्गदर्शक, खेळाडू, क्रीडाप्रेमी हे खो-खो पंच परीक्षेस बसू शकतील. अधिक महितीसाठी आशिष पाटील (९४२११६४८१७), राज्य क्रीडा मार्गदर्शक मनीषा मानकर (७०२०५५५३२९), लावण्य मगर (९९८७०७७३१७) किंवा अमोल जाधव (९७७३४२२२१४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली



पनवेल नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष
जानूशेठ कानाशेठ म्हात्रे
यांचे मंगळवार, दि. १२ एप्रिल २०२२ रोजी
अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!
आपले विनित : भारतीय जनता पार्टी, पनवेल

# क्रिकेट स्पर्धेत गोरेगाव शिक्षक संघ विजेता



**अलिबाग : प्रतिनिधी**

गोरेगाव प्राथमिक शिक्षक क्रिकेट ग्रुप आयोजित शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या क्रिकेट स्पर्धेत यजमान गोरेगाव शिक्षक संघाने विजेतेपद पटकावले. रोहा इलेव्हन संघ उपविजेता ठरला.

गोरेगाव येथील वेळासकर मैदानावर झालेल्या या स्पर्धेत अलिबाग, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा, महाड पोलादपूर, माणगाव, गोरेगाव पोलीस आदी नामांकित संघांनी सहभाग घेतला. अंतिम लढत रोहा विरुद्ध यजमान गोरेगाव प्राथमिक शिक्षक संघ यांच्यात चुरशीची झाली. विजयासाठी गोरेगाव संघाला शेवटच्या दोन चेंडूंवर ११ धावांची आवश्यकता होती. गोरेगावकडून खेळताना राजू काळबांडे यांनी दोन चेंडूंत दोन षटकार मारून विजयश्री खेचून आणली.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक रोहा इलेव्हन, तृतीय क्रमांक गोरेगाव पोलीस संघ आणि चतुर्थ क्रमांक लोणेरे प्राथमिक क्रिकेट संघाने मिळविला. उत्कृष्ट म्हणून राजू काळबांडे गोरेगाव, उत्कृष्ट गोलंदाज राजू पाठारे रोहा आणि मालिकावीर म्हणून उमेश पवार गोरेवाव यांना गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभास महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक) राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे, जिल्हाध्यक्ष संजय निजापकर, गोरेगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्रीकृष्ण नावले, पेण शिक्षक पतपेढीचे चेअरमन सूर्यकांत करंजीकर, माजी चेअरमन सुभाष भोपी, विजय पवार, वैभव कांबळे, जयदास घरत, महाड पतपेढीचे चेअरमन संजय कोंडविलकर, अलिबाग पतपेढीचे माजी चेअरमन जितेंद्र बोडके, पनवेल शिक्षक संघाचे अध्यक्ष संदीप जुईकर, तळा शिक्षक समितीचे अध्यक्ष विजय येलवे, माणगाव शिक्षक परिषदेचे अध्यक्ष गणेश निजापकर, शिक्षक समितीचे अध्यक्ष रमेश उभारे, शिक्षक संघाचे अध्यक्ष अंकुश महाडिक, समन्वय समितीचे अध्यक्ष सुहास चांदोरकर, विजय शिंदे, भाई दांडेकर, रत्नदीप चाफे, ज्ञानेश्वर सुर्वे आदींच्या उपस्थितीत झाले.

# प्रीमियर लीग फुटबॉल
# सिटी-लिव्हरपूल सामना बरोबरीत

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

मँचेस्टर सिटी आणि लिव्हरपूल यांच्यातील प्रीमियर लीग फुटबॉलचा सामना २-२ असा बरोबरीत सुटला. सिटीकडून केव्हिन डी ब्रूने आणि गॅब्रिएल जेसूस, तर लिव्हरपूलकडून दिओगो जोटा आणि सादियो माने यांनी गोल झळकावले.

या सामन्यात दोन्ही संघांमध्ये चांगली चुरस पाहायला मिळाली. सिटीच्या डी ब्रूनेने पाचव्या मिनिटाला गोल करीत सिटीला आघाडी मिळवून दिली. लिव्हरपूलच्या जोटाने (१३ वे मि.) गोल मारत सामना १-१ असा बरोबरीत आणला. आघाडीपटू जेसूसने ३७व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे सिटीला २-१ अशी पुन्हा आघाडी मिळाली, मात्र लिव्हरपूलच्या मानेने ४६व्या मिनिटाला गोल करत सामना २-२ असा बरोबरीत आणला. यानंतर दोन्ही संघ गोल करण्यात अपयशी ठरले.

या निकालानंतर सिटी (३१ सामन्यांत ७४ गुण) आणि लिव्हरपूल (३१ सामन्यांत ७३ गुण) गुणतालिकेत अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानी आहे. अन्य लढतीत लिस्टर सिटीने क्रिस्टल पॅलेसला २-१ अशा फरकाने पराभूत केले.

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...





भाजपा बूथ अध्यक्ष
राजेंद्र कोळी
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
भाजपा
सौजन्य : दर्शना भोईर (नगरसेविका)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com